विषय क्रमांक : ७५

प्रेषक : मुख्यलेखाधिकारी

प्रति : मा.नगरसचिव,

विषय : सन २०१०-२०११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाचा विषय मा.महासभेत घेणेबाबत.

विनंती टिप्पणी देण्यात येते की, सन २०१०-२०११ चे सुधारीत व सन २०११-२०१२ चे मुळ अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्र. ९० दि.२३-०२-२०११ अन्वये मंजुरी देण्यात आली असुन अखेर मंजुरीस्तव मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यास सुचित केले आहे.

सन २०१०-२०११ चे सुधारीत व सन २०११-२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाचा विषय मा.महानगरपालिका सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

मुख्यलेखाधिकारी,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**विषय यादी**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ७४ | दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७५ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यांत आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ चे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे मुळ बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक (स्कुल बोर्डासह) मा.स्थायी समिती ठराव क्र.९० दि.२३/२/२०११ अन्वये शिफारशी सह मंजूरीसाठी |
| ७६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

उपरोक्त विषय मा.सर्वसाधारण सभेपुढे घेणेस कृपया तारीख व वेळ मिळणेस विनंती आहे.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**मंगळवार दिनांक २९/३/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिका सभागृहात होणा-या मा. खास सभेची विषय पत्रिका**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| ७४ | दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७५ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यांत आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ चे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे मुळ बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक (स्कुल बोर्डासह) मा.स्थायी समिती ठराव क्र.९० दि.२३/२/२०११ अन्वये शिफारशी सह मंजूरीसाठी |
| ७६ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा. महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : २३/३/२०११
अहमदनगर

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०४ / २०११.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : २३ - ०३ -२०११.

**अहमदनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेची सुचना.**

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०४, दिनांक २९-०३-२०११.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.......................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

यांस-

महोदय / महोदया,

यान्द्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१(अ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २९-०३-२०११ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**सभा क्रमांक ०४**

**प्रस्ताव क्रमांक ७४** **दिनांक २९/०३/२०११**

---

**प्रस्तावाचा विषय -** दुखवटयाचा प्रस्ताव

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | केरळमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते के. करुणाकरण यांचे केरळ मधील त्रिसुर जिल्हा येथे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व आमदार मा.श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचे पुणे येथे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ३ | माजी नगराध्यक्ष श्री. नवनीतभाई बार्शीकर यांच्या व अहमदनगर नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका सौ. विजयाबाई बार्शीकर यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ४ | पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु, थोर तत्वज्ञ आणि शिक्षणतज्ञ प्राचार्य देवदत्त दाभोळकर यांचे पुणे येथे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ५ | मराठी रंगभूमीवरील जेष्ठ रंगकर्मी व प्रसिध्द नाटयकलाकार श्री. प्रभाकर पणशीकर यांचे पुणे येथे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | सामाजिक कार्येकर्त- श्री. विठ्ठलराव लक्ष्मणराव माने , रा. फकिरवाड,अ.नगर यांचे दि.२७/१/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७ | सामाजिक कार्येकर्त- श्री.दिनेश हरिराम चंदवाणी, रा. गोविंदपुरा,अ.नगर यांचे दि. २४/३/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी श्री. विजय चिंतामा नागुपरे , रा. यशवंतनगर ,अ. नगर यांचे दि.२७/३/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |

**ठराव :-** दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## सभा क्रमांक ०४

**प्रस्ताव क्रमांक ७५** **दिनांक २९/०३/२०११**

-----------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यांत आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००१०-२०११ चे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे मुळ बाबवार जमाखर्चाचे अंदाजपत्रक (स्कुल बोर्डासह) मा.स्थायी समिती ठराव क्र.९० दि.२३/२/२०११ अन्वये शिफारशीसह

---*---

**प्रस्तावाचा मजकूर** - सन २०१०-११ चे सुधारीत व सन २०११-२०१२ चे मुळ अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती ठराव क्र. ९० दि.२३-०२-२०११ अन्वये मंजुरी देण्यात आली असुन अखेर मंजुरीस्तव मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यास सुचित केले आहे.

तरी सन २०१०-२०११ चे सुधारीत व सन २०११-२०१२ चे मुळ अंदाजपत्रकाचा विषय मा.महानगरपालिका सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक २३/०२/२०११.

---*---

**मा.स्थायी समिती ठराव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.आयुक्त साहेब यांनी तयार केलेले व स्थायी समितीकडे सादर झालेले अहमदनगरमहानगरपालिकेचे सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे मुळ अंदाजपत्रक (म.न.पा. स्कुल बोर्डासह) व त्या सोबतचे दरवाढ करणेबाबत सादर केलेले प्रस्ताव सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे म.न.पा. स्कुल बोर्डासहचे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल साधक बाधक चर्चा करणेत येबुन ही सभा पुढिल प्रमाणे शिफारस दुरूस्त्या करत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा कमी जास्त करणेस नविन लेखाशिर्ष तयार करून त्यावर तरतुद करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

मा.आयुक्त साहेब यांनी मनोगता मध्ये व्यक्त केलेली कामे व सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाययोजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणे हद्दवाढीतील भागामध्ये पोहोच रस्ते विकसीत करणे करिता प्रस्तावीत रस्त्याचे कामासाठीचे रूपये ३ कोटीचे अंदाजपत्रकास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे. तसेच अंदाजपत्रका सोबतचे दरवाढ करणेबाबत सादर केलेले.

**प्रस्ताव क्र.१** :- वसुली विभाग- महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतील व्यापारी संकुलातील गाळयांचे हस्तांतरण करणेकामी आकारणी शुल्क आकारणे.

**प्रस्ताव क्र.२** :- वसुली विभाग- महानगरपालिकेत मालमत्ता नाव नोंदणी शुल्क १ टक्का आकारणेबाबत.

**प्रस्ताव क्र.३** :- सार्वजनिक बांधकाम विभाग- महानगरपालिकेच्या मालकीचे मंगल कार्यालये, सभागृह इ. चे भाडेत वाढ करणे व रस्ता फोडणे शुल्कात वाढ करणे.

**प्रस्ताव क्र.४** :- नगररचना विभाग- मोबाईल टॉवर दंड आकारणी दुप्पट करणेबाबत.

**प्रस्ताव क्र.५**:-कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह-अहमदनगर जिल्हयातील वेगवेगळया नर्सिंग इन्स्टिटयूटमधील प्रत्येक विद्यार्थी व विद्यार्थीनीकडून शुल्क आकारण्याबाबत.

**प्रस्ताव क्र.६** :- कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह- अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने, रूग्णालये व फिरता दवाखाना येथील दरवाढीबाबत.

**प्रस्ताव क्र.७** :- नगररचना विभाग- विकास भाराचे कमाल दर लागू करणेबाबत.

**प्रस्ताव क्र.८** :- नगररचना विभाग-मंजूर रेखांकन धारकाकडून अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व ड्रेनेज लाईनचे कामे करून घेणेबाबत.

**प्रस्ताव क्र.९** :- सार्वजनिक बांधकाम विभाग-मनपा हद्दीत विविध टेलीफोन कंपन्यामार्फत टाकण्यात येणा-या OFC केबल डक्ट बाबत.

या प्रस्तावास पुढिलप्रमाणे मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक १ :-** महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतील व्यापारी संकुलातील गाळयांचे हस्तांतरण करणे कामी रूपये १ लाख प्रती गाळा या प्रमाणे आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक २:-** महानगरपालिका अभिलेखामध्ये मिळकत धारकाचे नांवाची नोंद करण्यासाठी इमारत व जमिनीचे किंमतीवर १ टक्का याप्रमाणे दर आकारणी करणेस मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ३:-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या मंगल कार्यालये व सभागृहाच्या दैनंदिन भाडे व रस्ता फोडणेचे चार्जेस मध्ये खालील प्रमाणे दर निश्चित करून आकारणी करणेस शिफारस करण्यांत येत आहे.

| **अ.क्र.** | **कार्यालयाचे नांव** | **सध्याचे प्रचलित दर** | | **प्रस्तावित दर** | |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | **भाडे** | **डिपॉझीट** | **भाडे** | **डिपॉझीट** |
| १ | डॉ. महाले मंगल कार्यालय | १४८९/- | १३५०/- | ३०००/- | १३५०/- |
| २ | शिवपवन मंगल कार्यालय | ३३०९/- | १०००/- | ४५००/- | १०००/- |
| ३ | भाग्योदय मंगल कार्यालय | ६६१८/- | -- | ७५००/- | ५००/- |
| ३ | सावेडी क्रीडा संकुल सांस्कृतिक कार्यक्रम | भाडे रू. १०००/-<br>सेवाकर रू.१००/-<br>शिक्षण कर रू. २/-<br>उपकर रू.१/-<br>एकुण रू.११०३/- | | २०००/-<br>सेवाकर,<br>शिक्षणकर<br>व<br>उपकरासह | |
| ४ | व्यावसायिक कार्यक्रम | भाडे रू.५०००/-<br>सेवाकर रू.५००/-<br>शिक्षणकर रू.१०/-<br>उपकर रू.५/-<br>एकुण रू.५५१५/- | | १००००/-<br>सेवाकर,<br>शिक्षणकर<br>व<br>उपकरासह | |
| ५ | आंबेडकर स्मारक | ५५३/- | -- | १०००/ | ५००/- |
| ६ | महावीर कलादालन | ५५२/- | -- | १५००/- | ५००/- |
| ७ | जुने महानगरपालिका सभागृह | १२१३/- | -- | २०००/- | ५००/- |

तसेच डांबरी रस्ता फोडणेचे दर रूपये १५००/- आकारण्यांस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ४ :-** महानगरपालिका हद्दीमध्ये परवानगी व्यतिरिक्त अनधिकृत उभारलेल्या मोबाईल टॉवरवर दंड आकारणी बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे दुप्पट दंड आकारणी करणेस मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ५ :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे. दवाखाना व सुतिकागृह येथे अहमदनगर जिल्हयातील व नगर शहरातील नर्सिंग इन्स्टिटयूट चे कार्यानुभवासाठी व प्रशिक्षणासाठी येणा-या विद्यार्थी व विद्यार्थीनी कडून प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे शुल्क आकारणी करण्यांस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ६:-** अहमदनगर महानगरपालिकेचे दवाखाने रूग्णालये व फिरता दवाखाना येथील दरवाढी बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे दर आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ७ :-** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ अे ते १२४ एल व त्या खालील तरतुदीच्या अनुषंगाने महानगरपालिका हद्दीमध्ये विकास परवानगी देतांना आकारण्यांत येणा-या विकास भाराचे कमाल दर लागु करणेबाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे कमाल दर आकारणी करण्यांस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ८:-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मंजूर रेखांकनातील अंतर्गत सुधारणा करतांना रेखांकन धारका कडून अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व ड्रेनेज लाईनची कामे करून घेणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे मंजूरी देण्यांस शिफारस करण्यांत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ९:-**अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये विविध टेलीफोन कंपन्यामार्फत टाकण्यांत येणा-या OFC केबल डक्ट बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

तसेच

* महिला व बाल कल्याण कार्यक्रम या लेखाशिर्षातून रूपये १ कोटी ५० लाखाची रक्कम ही कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी खर्च करावी. व या इमारतीमध्ये अद्ययावत सुतिका गृह व नवीन बालरूग्ण विभाग करण्यात यावीत.

* महानगरपालिका हद्दीत लागणारे अनधिकृत जाहिरात बोर्डवर कार्यवाही करून त्यावर आकारणी करण्यांत यावी.

* रस्ता बाजू फी वसुली ठेका देणेकामी रस्ता बाजू फी रूपये २५ लाख निश्चित करून जाहिर निविदा मागविण्यांस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

* बेकायदेशीर नळ कनेक्शन संबंधी कडक कार्यवाही करावी पाणीपट्टीची तसेच घरपट्टी थकबाकीची वसुली वाढवावी.

* महानगरपालिकेने १ व्हेटनरी डॉक्टर व २ सहाय्यक कर्मचारी नेमून त्यांचेकडून फिरत्या उनाड कुत्र्याचे निर्बीजीकरण करणेत यावे. तसेच रोगट कुत्र्यांवर उपचार करावेत.

* मा. महिला व बाल कल्याण समिती व मा.स्थायी समिती सभे करिता चहापान आणणे कमी रूपये ३,०००/- ऐवजी रूपये ४५००/- चे खर्चास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

* मा.सदस्यांनी सुचविलेली कामे अंदाजपत्रकातील त्यांना मंजूर करण्यांत आलेल्या स्वेच्छा निधी व वॉर्ड विकास निधीतुन करण्यांत यावीत.

* खाजगी तत्वावर कचरा संकलन व वाहतुक करणे कामी झोन वाईज निविदा मागविण्यांत याव्यात.

* अहमदनगर महानगरपालिकेचे औरंगाबाद रोड वरील नविन प्रशासकीय इमारती मधील सभागृह मा.जिल्हाधिकारी साहेब यांचेकडील कार्यक्रम व अहमदनगर महानगरपालिकेचे कार्यक्रमा व्यतिरिक्त इतर कुणालाही कुठल्याही कार्यक्रमासाठी देण्यांत येउ नये.

* गोविंदपुरा, यशवंत कॉलनी , विराज कॉलनी, यशवंतनगर, (शहा कॉलनी) शितल कॉलनी, पठाण कॉलनी, गोकुळनगरी, इक्रा परिसर, रहेमिनया कॉलनी, मोठी मरियम मस्जिद परिसर याठिकाणी १५०वॅट सोडीयम व्हेपर बसविणेबाबत. अंदाजपत्रकीय रक्कम रू.१०,००,०००/- चे खर्चास १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे / उर्जा बचत दिवे बसविणे या लेखाशिर्षातून खर्च करणेस मंजूरी देणेत येत आहे.

* गांधी मैदान पसिरातील आतील भागाचे सिमेंट कॉक्रीटीकरण, सुभोभिकरण, इलेक्ट्रीक व्यवस्था करणेबाबत अंदाजपत्रकीय रक्कम रू. २०,००,०००/- चे खर्चास चौक सुधारणा व रूंदीकरण या लेखाशिर्षातून खर्च करणेस मंजूरी देणेत येत आहे.

* जिल्हा परिषद कर्मचारी वसाहत येथे पंपगृह उभारणे व पाईप लाईन टाकणेकामी अंदाजपत्रकीय रक्कम रू. १०,००,०००/- चे खर्चास पाणी पुरवठा योजनेसाठी नविन सुधारणा कामे करणे या लेखाशिर्षातून खर्च करणेस मंजूरी देणेत येत आहे.

अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिकेच्या स्कुल बोर्डासह शेअर्ससह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

**सोबत** :- * सन २०१०-२०११ सालचे सुधारित व सन २०११-२०१२ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता

* महानगरपालिकेचे हद्दवाढीतील गावाकरिताचे पोहोच रस्ते विकसीत करणेची प्रस्तावीत कामे व खर्च तरतुदीचा तक्ता

**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर**

**मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २०१०-२०११ चा अर्थसंकल्प**

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०१०)........................................५९५९०९३१**

**एकुण जमा.....................................................................२११०४४४१००**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा...............................................२१७००३५०३१**

**एकुण खर्च.................................................................... २११०३४९२००**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०११)....................................५९६८५८३१**

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मनपा दवाखान्यांसाठी औषधे व उपकरणे खरेदी | १३००००० | १२००००० | | २५००००० |
| २ | महापौर चषक स्पर्धा | १०००००० | | ४००००० | ६००००० |
| ३ | सांस्कृतिक कार्यक्रम घेणे | २०००००० | १०००००० | | ३०००००० |
| ४ | सहावे वेतन आयोग फरक | २००००००० | | ८००००० | १९२००००० |
| ५ | वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती | २०००००० | | ४२५००० | १५७५००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | वसुली परतावा (मालमत्ता कर, पाणीपट्टी इ.) | १५००००० | | ५००००० | १०००००० |
| ७ | मनपा इमारत व रोखपाल विमा | १७५००० | २५००० | | २००००० |
| ८ | हत्यारे व अवजारे खरेदी | ४००००० | | १००००० | ३००००० |
| | | | | | |
| | एकूण | **२८३७५०००** | **२२२५०००** | **२२२५०००** | **२८३७५०००** |
| | | | | | |

स्वाक्षरी /-
(श्री. संजय गाडे),
सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका ,अ.नगर

**अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर**

**मा. स्थायी सभेने शिफारस केलेला सन २०११-२०१२ चा अर्थसंकल्प**

**सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०११)........................................५९६८५८३१**

**एकुण जमा...................................................................२०८४५८९१००**

**सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा..............................................२१४४२७४९३१**

**एकुण खर्च................................................................. २०८७२२९०००**

**अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०१२)....................................५७०४५९३१**

| अ.नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू) | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ४५००००००० | ७०००००००० | | ५२००००००० |
| २ | मार्केट व स्लॉटर फी (रस्ता बाजू फी) | ११००००० | १४००००० | | २५००००० |
| ३ | नळधाऱ्काकडून पाणीपट्टी जमा | १४००००००० | १२८३०००० | | १५२८३०००० |
| ४ | जकात कर | ५८३११०००० | ३००००००० | | ६१३११०००० |
| ५ | मालमत्ता नाव नोंदणी फी | ३३००००० | ६५००००० | | ९८००००० |
| ६ | बाधा, वापरा, हस्तांतरीत करा/एफबीटी प्रकल्प प्रिमियम | १००००० | २०००००००० | | २०१००००० |
| | | | | | |
| | एकूण | **११७७६१००००** | **१४०७३००००** | ० | **१३१८३४००००** |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | साप्रवि आकस्मिक खर्च | ९००००० | १००००० | | १०००००० |
| २ | उल्लेखनीय कार्यबद्दल गौरव | २०००० | २०००० | | ४०००० |
| ३ | उनाड कुत्री बंदोबस्त व दंशावर उपचार | २०००००० | | १०००००० | १०००००० |
| ४ | विद्युत साहित्य खरेदी | ३५००००० | ५००००० | | ४०००००० |
| ५ | नविन इले. पोल व स्पॅन फिटींग़ | १०००००० | १०००००० | | २०००००० |
| ६ | हातगाड्या, ढकलगाड्या, सायलरिक्षा खरेदी | २००००० | | १९०००० | १०००० |
| ७ | रक्तपेढी वैद्यकीय अधिकारी व तंत्रज्ञ कंत्राटी नेमणूक | ० | १०००००० | | १०००००० |
| ८ | नविन शववाहिनी खरेदी | ० | ५००००० | | ५००००० |
| ९ | रस्ते कॉक्रीटीकरण | २५००००० | | २४००००० | १००००० |
| १० | पूल बांधणे | २०००००० | | १५००००० | ५००००० |
| ११ | महापौर चषक स्पर्धा | २०००००० | | १०००००० | १०००००० |
| १२ | सिना नदी पात्रातील अतिक्रमणे हटविणे | १२००००० | ३००००० | | १५००००० |
| १३ | गणवेश खरेदी (शिक्षण मंडळ) | ५००००० | | ३५०००० | १५०००० |
| १४ | बेंच व फनिचर खरेदी व दुरुस्ती | ५०००० | ३००००० | | ३५०००० |
| १५ | ए. व्ही. रुम | १००० | १५०००० | | १५१००० |
| १६ | क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम (शिक्षण मंडळ) | १००००० | १००००० | | २००००० |
| १७ | गटर दुरुस्ती | ३०००००० | | **१००००००** | २०००००० |
| १८ | टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे | ५०००००० | | **२५०००००** | २५००००० |
| १९ | रस्ते डांबरीकरण व नुतणीकरण | ५०००००० | १०००००० | | ६०००००० |
| २० | नविन इमारती | २०००००० | | १८००००० | २००००० |
| २१ | अधिकारी यांचे निवास बांधणे व सोयीसुविधा | २०००००० | | १०००००० | १०००००० |
| २२ | चौक सुधारणा व रुंदीकरण | १०००००० | २५००००० | | ३५००००० |
| २३ | स्मशानभूमी सुधारणा व नविन स्मशानभूमी | १०००००० | १०००००० | | २०००००० |

| अ.नं. | लेखाशिर्ष (खर्च बाजू) | मा. आयुक्त यांनी सुचविलेली तरतुद | मा. स्थायी सभेने केलेले बदल | | मा.स्थायी समितीने शिफारस केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| २४ | महापौर शहर विकास निधी | ० | ५०००००० | | ५०००००० |
| २५ | उपमहापौर शहर विकास निधी | ० | २५००००० | | २५००००० |
| २६ | स्थायी समिती सभापती शहर विकास निधी | ० | २५००००० | | २५००००० |
| २७ | महिला व बाल कल्याण समिती सभापती विकास निधी | ० | २५००००० | | २५००००० |
| २८ | वॉर्ड विकास निधी | ० | ७७०००००० | | ७७०००००० |
| २९ | शहरात नविन पाईप लाईन टाकणे | २०००००० | | १०००००० | १०००००० |
| ३० | वाढीव हद्दीत नविन पाईप लाईन टाकणे | २०००००० | | १०००००० | १०००००० |
| ३१ | १५० वॅट सोडीयम व्हेपर पोल टाकणे | ५००००० | १०००००० | | १५००००० |
| ३२ | नविन संग़णक खरेदी/ ई गव्हर्नन्स | २००००० | १५००००० | | १७००००० |
| ३३ | मनपा हद्दवाढीत समाविष्ट भागात पोहोच रस्ते करने ( सोबत यादीप्रमाणे ) | २०००००० | १०००००० | | ३०००००० |
| | एकूण | ५९६७१००० | १५५४७०००० | १४७४०००० | २००४०१००० |

स्वाक्षरी /-
(श्री. संजय गाडे),
सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका ,अ.नगर

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

### सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षात आवश्यक पोहोच रस्ते विकसीत करणेकरीता प्रस्तावीत कामांची यादी

| अ..क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | विराज कॉलनी अंतर्गत रस्ते ते नगर-मनमाड हायवे पर्यत पोहोच रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.२५,००,०००/- |
| २ | इक्रा स्कुल परिसरातील रस्ते नगर-औरंगाबाद रोड हायवे पर्यत पोहोच रस्ता डांबरीकरण करणेबाबत | रू.२०,००,०००/- |
| ३ | बुरूडगांव रोड वरील पुणे हायवे ते चाहुराणा बुद्रुक ते आदर्श पार्क, पुणे हायवे ते विनायकनगर व बुरूडगाव रोड बालाजी कॉलनी सर्व जोड रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.४०,००,०००/- |
| ४ | वडगाव रोड ते अर्थव रो. हौसिंग सोसायटी ते यश रो. हौसिंग सोसायटी ते जय मंगल नगरी पर्यत रस्ता डांबरीकरण व मजबुतीकरण करणेबाबत. | रू. २०,००,०००/- |
| ५ | मनमाड हायवे ते नागापूर गावठाणा पर्यत रस्ता डांबरीकरण व मजबुतीकरण करून मिळले बाबत. | रू. २०,००,०००/- |
| ६ | कवडेनगर पारिजात कॉलनी नगर-मनमाड रोडला जोडणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत. | रू. २०,००,०००/- |
| ७ | महावीर नगर ते भिंगारदिवे चाळ नगर-मनमाड रोड जोडणारा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.२०,००,०००/- |
| ८ | जुना पिंपळगाव रस्ता ते भिस्तबाग शिव रस्ता व तपोवन रस्ता व संचारनगर माउलीनगर अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डंबरीकरण करणेबाबत. | रू.२०,००,०००/- |
| ९ | नामदेव चौक ते नित्यसेवा ते भगवानबाबा चौक ते तपोवन रोड पर्यतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत | रू.२५,००,०००/- |
| १० | सारसनगर मधील व्ही.डी.ओकॉन ते वाकोडी रोड पर्यत रस्त्याचे मजबुतीकरण करणेबाबत. | रू.२०,००,०००/- |
| ११ | सोलापूर रोड शांतीनगर ते नामगंगा पर्यत रस्त्याचे मजबुतीकरण करणेबाबत | रू. १५,००,०००/- |
| १२ | सावेडी राजनगर ते एकविरा चौक पर्यत रस्त्याचे मजबुतीकरण करणेबाबत. | रू. २५,००,०००/- |

P.T.O.

| | | |
|---|---|---|
| १३ | सावेडी येथील स.नं. ८७ मधील अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत. | रू.७,००,०००/- |
| १४ | भिस्तबाग येथील स.नं. २३,११,१२ मधील अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणेबाबत. | रू. ७,००,०००/- |
| १५ | पवननगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत | रू.७,००,०००/- |
| १६ | वारूळाचा मारूती रस्ता व दातरंगे मळा परिसर रस्ते मजबुतीकरण करणेबाबत | रू. ९,००,०००/- |
| | **एकुण** | **रू. ३,००,००,०००/-** |

चर्चा :-

दुखवटयाचा प्रस्ताव.

विषय क्रमांक : ७५ :- वाचुन दाखविण्यात आला. त्यावर मा.श्री.बाळासाहेब बोराटे यांनी जपान या देशात त्सुनामी घटनेत मृत्युमूखी पडलेल्या तेथील नागरिकांचा दुखवटा प्रस्ताव समाविष्ट करावा असे सुचित केले व अभिवादन करावे.

मुख्यलेखाधिकारी :- सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २००९-२०१० सालचे सुधारित व सन २०१०-२०११ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिकेचे स्कुल बोर्ड चे शेअर्ससह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

मा.श्री.संदिप कोतकर :- मा.शासनाने नुकतेच महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेत ५०% आरक्षणाबाबतचे विधेयक संमत केले त्याबद्दल शासनाचे अभिनंदनाचा ठराव घेण्यात यावा.

मा.श्री.आरीफ शेख :- मा.श्री.संदिप कोतकर यांनी जी सूचना मांडली त्यास मी अनुमोदन देतो.

मुख्यलेखाधिकारी :- सर्व प्रथम सन २००९-२०१० सालचे सुधारित व सन २०१०-२०११ सालचे बाबवार अंदाजपत्रक बाबत मा.स्थायी समिती सभापती आपले मनोगत व्यक्त करतील.

मा.श्री.शिवाजी लोंढे :- मा.स्थायी समितीच्या निवृत्त झालेल्या आठ सदस्यांच्या जागी नविन नेमणूका अद्यापही झालेल्या नसुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुद वाचुन दाखविली. सभापतींना कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्याचा अधिकार नाही.

मा.सभापती :- यांनी त्यांचे सन २००९-२०१० सालचे सुधारित व सन २०१०-२०११ सालचे बाबवार अंदाजपत्रक बाबत मनोगत वाचन केले. तसेच मालमत्ता कर वसुली संदर्भात चार प्रभाग समिती निहाय सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात ज्या वसुली लिपीक यांनी त्यांचे प्रभाग समितीमध्ये जास्तीत जास्त टक्केवारीने वसुली केली आहे अशा प्रत्येक प्रभागातील एका लिपीकास / मदतनिस यांस प्रत्येकी ४,०००/- चारही प्रभाग समित्यांना बक्षिस स्वरुपात देण्यात यावी. तसेच चार प्रभाग समिती पैकी ज्या प्रभाग समितीची वसुलीची टक्केवारी जास्त आहे अशा प्रभाग अधिका-यास रोख पारितोषिक रक्कम रु. ५,०००/- फक्त देण्यात येवून त्यांचा हार बुके देवुन सत्कार करण्यात यावा. अंदाजपत्रक सादर करणेकामी मा.महापौर, मा.आयुक्त, मा.उपायुक्त, मा.मुख्यलेखाधिकारी व इतर अधिकारी, पदाधिकारी नगरसेवक यांनी केलेल्या सहकार्याबद्दल तसेच पत्रकार फोटोग्राफर यांचे आभार मानले.

मा.श्री.किशोर डागवाले :- मा.स्थायी समिती सभापती यांना तीन वेळेस अंदाजपत्रक सादर करण्याची संधी मिळाली ही उल्लेखनिय बाब आहे. अंदाजपत्रकाच्या प्रती सर्वांना मिळाल्या आहेत. त्यावर अभ्यास करण्यासाठी वेळ मिळावा व हि सभा उद्या सकाळी १०.०० वाजता बोलाविण्यात यावी. अशी मी मागणी करतो.

**मा.महापौर साो :-** श्री.डागवाले साहेब यांनी केलेल्या सुचनेनुसार आजची सभा मा.सदस्यांना अंदापत्रकावर अभ्यास करण्यासाठी तहकुब करण्यात येत आहे. तहकुब सभा उद्या बुधवार दिनांक ३०/०३/२०११ रोजी सकाळी १०.०० वाजता सभा सुरुकरण्यात येईल.

श्री.अनिल लोंढे अकौंट विभाग यांनी अंदाजपत्रकाचे वाचन करुन दाखविले.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** अंदाजपत्रकाची ही विशेष सभा कोणी बोलाविली ? मा.स्थायी समितीच्या कोणत्या सदस्यांनी याद्या दिल्या त्यांची नांवे सांगा.

**नगरसचिव :-** ही सभा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण दोन स्थायी समिती कामकाज नियम एक चे (ह) मधील तरतुदीनुसार बोलाविण्यात आलेली आहे.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** सभा बोलाविण्याचा अधिकार कोणाला आहे ?

**नगरसचिव :-** सभा बोलाविण्याचे मा.महापौर साो यांना आहेत. तहकुब सभेची नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी नुसार फेब्रुवारी महिन्याच्या ३० तारखेला अंदाजपत्रक निश्चित केले पाहिजे अशी तरतुद असुन कलम ९६ / ४ चे वाचन केले.

**मा.सौ.अनभुले :-** नगरसेवक निधीची तरतुद ५० % करण्यात यावी.

**मा.श्री.कवडे :-** अंदाजपत्रकाचे पान नंबर ७ वर मंगलकार्यालय सावेडी क्रीडा संकुल, जुने सभागृह, भाडे दरवाढ केलेली आहे. नालेगांव येथील शिवपवन मंगलकार्यालय, केडगांव येथील भाग्योदय मंगलकार्यालय येथे गोरगरीबांसाठी या कार्यालयाचा वापर करण्यात येतो. इतर ठिकाणचे मंगलकार्यालये त्यांना घेणे परवडत नाही. सध्या मंगलकार्यालय ५,०००/- रुपयाचे भाडेवाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे. ही दरवाढ सर्वसामान्य जनतेला परवडणारी नाही. याकरीता मंगलकार्यालयांचे दर हे ३,५००/- ठेवण्यात यावेत अशी मी मागणी करतो.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** श्री.गणेश कवडे यांनी जी सूचना मांडली त्यास माझी अनुमती आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** पान नंबर ६८ वर सावेडी गावठाण सिटी सर्व्हे साठी १० हजार तरतुद केलेली आहे. ही तरतुद या वर्षी कमी का करण्यात आली. सदरची तरतुद वाढविण्यांत यावी.

**श्री.बल्लाळ :-** सदरची तरतुद ही टोकन तरतुद ठेवण्यात आलेली आहे. रक्कम रु.५ लाख तरतुद ठेवण्यात येईल.

**मा.सौ.आशा कराळे :-** सावेडी गावठाण ऐवजी सिटी सर्व्हे व्हावा या कामासाठी बजेटमध्ये १ लाख तरतुद ठेवली आहे ती तरतुद १० लक्ष रुपये ठेवणेत यावी.

**मा.आयुक्त साो :-** मागणी बरोबर आहे. मा.शासनाकडुन जशी मागणी येते तशी तरतुद करण्यांत येते.

**मा.श्री.संदिप कोतकर :-** गावठाणातील सिटी सर्व्हे फी बाबत मागणी व्यवस्थीत करण्यात यावी. गेल्या अनेक वर्षापासुन हा प्रश्न प्रलंबित असुन सिटी सर्व्हे होणे महत्वाचे आहे. अधिकारी पातळीवर या बाबत मा.महसुल मंत्री यांचेकडे निवेदन देवुन पाठपुरावा करण्यात यावा. आम्हीही यासाठी प्रयत्न करु.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** पान नंबर ७४ वर आरोग्य विभागासाठी गमबुट खरेदीस किती रक्कम दर्शविण्यात आलेली आहे. दैनिक लोकमत मधील बातमी ४ लाखाचे गमबुट खरेदी केले. अशी छापुन आलेली आहे. यावर्षी तरतुद १ लाख असतांना ४ लाखाची खरेदी कशी करण्यात आली.

**श्री.पैठणकर :-** मागच्या वर्षी खरेदी रु.८४,४५०/- ची खरेदी केलेली आहे. वृत्तपत्राच्या बातमी बद्दल मी काहीही सांगु शकत नाही.

**मा.श्री.निखिल वारे :-** फिरते शौचालय वाहनाचे आज मितीला काय परिस्थिती आहे.

**श्री.पैठणकर :-** फिरते शौचालय नादुरुस्त असुन नविन खरेदी प्रक्रीया चालू आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** ६ - ६ महिने सदरचे वाहन बंद ठेवतात. या बजेटमध्ये याकामी तरतुद करावी असे आपणास वाटत नाही का ?

**श्री.पैठणकर :-** तरतुद करण्यात आलेली आहे. १५ दिवसात नविन वाहनाबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**मा.आयुक्त सो :-** मागच्या वर्षी तरतुद करुन ऑर्डर दिली आहे. यावर्षी तरतुदीची आवश्यकता नाही.

**मा.श्री.निखिल वारे :-** पान नंबर ७२ वर कायम आस्थापना तरतुद किती ठेवली. सावेडी उपनगरात सफाई कामगार मिळत नाहीत. उद्यान कर्मचारी मिळत नाहीत. स्थायी आस्थापनेवर एवढी तरतुद असतांना कर्मचारी का मिळत नाहीत.

**श्री.पैठणकर :-** कर्मचा-यांचे वेतनावर जो ॲक्च्युअल खर्च येतो तो नमुद केला आहे. वाढीव कर्मचा-यांसाठी मा.शासनाकडुन पद मंजूर करुन घ्यावे लागतील.

**मा.श्री.निखिल वारे :-** घनकचरा प्रकल्प मंजूर करतांना त्यावेळी शहरातील सफाई कर्मचारी हे उपनगरात वर्ग करण्यांत येतील असे आश्वासन देण्यात आले होते. परंतु त्याचीही कार्यवाही झालेली नाही.

**श्री.पैठणकर :-** या प्रकल्पासाठी नेमलेल्या ठेकेदाराने काम न केल्याने प्रस्तावित मागणीची पुर्तता करता आलेली नाही.

**मा.आयुक्त सो :-** खाजगी करणातुन प्रयत्न करण्यात आला होता परंतु त्यास यश आलेले नाही.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** वॉर्ड क्रमांक ५७ मध्ये सार्वजनिक शौचालयासाठी वारंवार मागणी करुनही एकही कर्मचारी मिळत नाही. याबाबत खुलासा करण्यात यावा.

**श्री.पैठणकर :-** आठ दिवसात आपले मागणी नुसार कर्मचा-यांची व्यवस्था करण्यात येईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आपण अंदाजपत्रक मंजूर करतो ख-या अर्थाने सर्व सामान्य नागरिकांना त्यांचा न्याय मिळत नाही. आपण दरवाढ करतो त्याची अंमलबजावणी कधी करतो.

**मा.आयुक्त सो :-** दरवाढी नंतर नोटीस द्यावी लागते. नविन वर्षात आपण दरवाढ लागू करतो.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सन २००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११ या प्रत्येक वर्षी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांचे पुतळ्यासाठी तरतुद करुनही अद्यापपर्यंत काम झालेले नाही. यावर्षीही १० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. या विलंबास कोण जबाबदार आहे. कामच होणार नसेल तर तरतुद का करतो.

**श्री.मगर शहर अभियंता :-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या संदर्भात सदरचा पुतळा हा राज्यमार्ग डाव्याबाजूस रस्त्यालगत हा पुतळा ३५ मीटर अंतरा बाहेर उभारण्यास हरकत नसले बाबत बांधकाम विभागाकडुन पत्र प्राप्त झालेले आहे. या पत्रानुसार पुतळ्यासाठी जागा शिल्लक रहात नाही. महात्मा फुले पुतळ्या संदर्भात आठ दिवसात आर्किटेक्ट यांचेकडुन जागेचा लोकेशन प्लॅन, ले-आउट व अटी-शर्ती सह शासन निर्णयाप्रमाणे निर्णय घेण्यात येईल.

**मा.श्री.शेख आरीफ रफीउद्दीन, सभागृह नेता :-** सर्जेपुरा व्हाईट हाउस मागे महानगरपालिकेने अद्यावत जीम बांधली आहे तीच्यावर  योग्य ते नियंत्रण रहावे जीमचे साहित्य इमारतीची निगा रहावी यासाठी संबंधित क्षेत्रातील जाणकार संस्था यांना ती चालविणेस देणेत यावी व जागा व साहित्य यांच्या वापरापोटी दरमहा भाडेतत्वावर महानगरपालिकेने जीम देणे बाबत कार्यवाही करावी. अशी विनंती आहे. मी यादी सभागृहापुढे मा.महापौरांना देत आहे.

**मा.श्री.संजय बाबुराव गाडे, सभापती स्थायी समिती :-** यापुर्वी स्थायी समिती ठरावान्वये अशा प्रकारे जीम चालविणेस दिलेल्या आहेत त्याप्रमाणे ही जीम देणेत यावी जीम व्यवस्थीत राहिल्यास त्यापासुन  महानगरपालिकेस उत्पन्न मिळेल.

**मा.महापौर :-** सदर जीम त्वरीत चालविणेस देणे बाबत प्रशासनाने तात्काळ योग्य ती कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त सो :-** सध्याचा पुतळा हा अर्धाकृती असुन पुर्णाकृती पुतळ्यासाठी शासनाची परवानगी आवश्यक आहे. तातडीने याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** कै.बा.दे.दवाखाना दरवाढ प्रस्तावित केलेली आहे. आजही सर्वसामान्य नागरिकांना पाहिजे तशा सुविधा मिळत नाहीत. भाडेवाढीची गरज वाटत नाही.

**मा.आयुक्त सो :-** उत्पन्नात वाढ व्हावी म्हणुन दरवाढ केलेली नाही. महानगरपालिकेचा खर्च  वसुल व्हावा एवढाच उद्देश त्यामागे आहे. कै.बा.दे.दवाखान्यातही काही त्रुटी असतील तर त्या दुर करण्यात येतील.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आपण प्लेटलेट उपलब्ध करुन देतो का ?

**मा.आयुक्त सो :-** सध्या देत नाही. भविष्यात सुविधा उपलब्ध करुन द्यावयाची असेल तर त्याकरीता अंदाजपत्रकात तरतुद करणे आवश्यक आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** रक्तपेढी मध्ये रिप्लेसमेंट दिलेतरच रक्त उपलब्ध करुन दिले जाते. सरसकट ४५०/- रुपये दर लावणेंत आले आहे.

**डॉ.बोरगे :-** शहरातील इतर रक्तपेढींच्या तुलनेत महानगरपालिकेच्या रक्तपेढीचे दर खुप कमी आहेत. रक्ताची मागणी जास्त व पुरवठा कमी आहे. स्टॉक असेल तर आपण रिप्लेसमेंटचा आग्रह करत नाही. प्लेटरेटचे दर हे अतिशय वाजवी आहेत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** दरवाढ करण्यापुर्वी सुविधा उपलब्ध करुन द्या. डोनर वाढविण्याची जबाबदारी रक्तपेढी प्रमुख म्हणुन तुमची आहे. आपण त्यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. विविध कॉलेजेस, संस्था यांचेशी संपर्क साधुन रक्तदान शिबिरे घडवुन आणली पाहिजेत.

**डॉक्टर श्री.बोरगे :-** मागील वर्षी ४ हजार रक्तपिशव्या जमा झाल्या त्यापैकी ३ हजार व्हॅलेंटरी जमा आहेत. शक्यतो  यावर्षी १०० टक्के रक्तदान शिबिर घेण्याचा प्रयत्न करु.

**सभापती मा.श्री.संजय गाडे :-**  सभागृहात विचित्र आवाज काढणे चुकीचे आहे. सभागृहाचे काही संकेत आहेत की नाही. याचे भान सदस्यांनी ठेवणे आवश्यक आहे.

**मा.श्री.सचिन पारखी :-** सभागृहाची मी माफी मागतो.

**मा.महापौर सो :-** सभागृहाचा अवमान होईल असे कोणीही वागू नये.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मा.जिल्हा अधिकारी साहेबांकडे केलेल्या तक्रारीनुसार काय कार्यवाही केली आहे. किती कुत्र्यांवर शस्त्रक्रीया केलेल्या आहेत. आमच्या माहितीनुसार एक-दोनच शस्त्रक्रीया केल्या जातात व अवाढव्य बिल ठेकेदारास अदा केले जाते.

**डॉ.श्री.बोरगे :-** प्रत्येक दिवस निहाय शस्त्रक्रीया केलेल्या माहितीचा डाटा वाचून दाखविला.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** एवढया शस्त्रक्रीया झाल्या मग शहरात एवढी कुत्री का येतात. वृत्तपत्रात याबाबत उलट सुलट बातम्या छापुन येतात.

**डॉ.श्री.बोरगे :-** निर्बिजीकरणाचे टेंडर देतांना कुत्र्यांची गणना केलेली नाही. निर्बिजी करणासाठी मोठयाप्रमाणावर प्रोग्रॅम होणे आवश्यक आहे. ठेकेदाराबरोबर महानगरपालिकेची यंत्रणा या कामी उभी केली तरच ब-यापैकी परिस्थिती नियंत्रणाखाली येवू शकते.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** या संदर्भात मा.जिल्हाधिकारी साहेबांचे काय पत्र आहे.

**डॉ.श्री.बोरगे :-** डॉ.अनिल कटारिया यांनी श्वान निर्बिजीकरण प्रकल्पाबाबत मा.जिल्हाधिकारी साहेबांकडे या प्रकल्पात कुत्र्यांची निगा व्यवस्थीत ठेवली जात नाही. त्यांना खायला अन्न दिले जात नाही व इतर बाबतीत अर्ज केला होता. या अर्जानुसार संबंधित एस.आय. व सी.एस.आय. यांनी समक्ष भेट देवून समक्ष पाहणी केली असुन सर्व परिस्थती व्यवस्थीत असले बाबत अहवाल दिला आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मा.आमदारांचे मानधन वाढविण्यात आलेले आहे. नगरसेवकांना फोन बिल, पी.ए., इंधन इत्यादीवर मोठया प्रमाणात खर्च होतो. तरी नगरसेवकांचे मानधन वाढीसाठी मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** मार्केटयार्ड समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा अतिक्रमण संदर्भात जी बैठक झाली त्यावर पुढील कार्यवाही काय करण्यात आली. तसेच हॉटेल सुखसागर वर आरोग्य विभागामार्फत काय कार्यवाही करण्यात आली.

**श्री.मगर शहर अभियंता :-** सदर पुतळयाची जागा महामार्गा लगत असल्याने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे दिनांक २५/०३/२०१० रोजीचे पत्रानुसार सदर पुतळा हा ३५ मीटर अंतरा बाहेर उभारण्यास हरकत नसले बाबत बांधकाम विभागाकडुन पत्र प्राप्त झालेले आहे. या पत्रानुसार पुतळयासाठी जागा शिल्लक रहात नाही.

**श्री.इथापे :-** या पुतळया मागे महानगरपालिकेच्या जागेतील अतिक्रमण काढणेचा प्रयत्न करणेत आला परंतु तेथील हॉटेल मालकाने वरिष्ठ न्यायालयामध्ये दाद मागितली असुन मा.न्यायालयाचा स्थगिती आदेश असल्यामुळे कारवाई करता येत नाही. स्थगिती आदेश उठविणे संदर्भात स्पेशल ॲडव्होकेट यांची नेमणुक करण्यात आलेली आहे.

**डॉ.बोरगे :-** हॉटेल सुखसागरची मुख्य स्वच्छता निरीक्षक व फुड इन्स्पेक्टर यांनी तपासणी केली असुन त्रुटीबाबत त्यांचे म्हणणे मागितले आहे. कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यापुर्वी म्हणणे मागविणे आवश्यक आहे. चार दिवसात कारवाई करण्यात येईल.

**मा.आयुक्त :-** सदर हॉटेलचा परवाना रद्द करणे बाबत कारवाई पुढच्या पंधरा दिवसात आरोग्याधिकारी यांनी करावी. ३७ मीटर अंतर सोडून पुतळा बसविणे संदर्भात सूचना प्राप्त झाल्याने अडचणी येत आहेत. पुतळ्यामागील इमारतही ३७ मीटरच्या आत येते.

**श्री.बल्लाळ :-** बी.ॲण्ड सी कडुन पत्र प्राप्त झाले असून पर्यायी जागेचा आम्ही शोध घेण्यात येत आहे.

**मा.श्री.सुनिल कांबळे :-** पुतळ्याच्या पाठीमागे महानगरपालिकेची जागा असतांना इतर ठिकाणी जागेचा शोध कशासाठी घ्यावयाचा.

**मा.श्री.गव्हाळे विजय :-** आहे त्याच ठिकाणी पुतळा बसविण्यात यावा.

**मा.श्री.सुनिल कांबळे :-** पंधरा दिवसात अतिक्रमण हटविणे संदर्भात कारवाई करण्यात यावी. अन्यथा नागरिकांच्या सहकार्याने जेसीबी व्दारे अतिक्रमण काढण्यात येईल.

**मा.श्री.संजय चोपडा :-** मा.महापौर निधीतुन केडगांव करीता एक स्वीमिंग टँकची तरतुद करण्यात यावी. आमच्या नगरसेवक निधीतील हिस्सा देण्यासही हरकत नाही. महानगरपालिका हद्दीतुन केबल टाकण्यात येतात याकरीता या कंपन्यांकडुन आपण भाडेही घेत नाही. इतर महानगरपालिकेत भाडे घेतले जाते. महानगरपालिका उत्पन्नाचे हे चांगले स्त्रोत आहे. एम.एस.ई.बी मार्फत पोल लावले जातात त्याचेही भाडे महानगरपालिकेस मिळाले पाहिजे यासाठी कोणीही पाठपुरावा करीत नाही. अग्निशमन विभागाकरीता ५० हजार लोकसंख्येकरीता एक फायर स्टेशन असावे अशी तरतुद आहे. महानगरपालिकेचे सध्या दोन फायर स्टेशन असुन वाढीव फायर स्टेशन उभारणे संदर्भात अंदाजपत्रकात तरतुद केलेली आढळुन येत नाही. या फायर स्टेशन शेजारीच कर्मचा-यांना निवासस्थानासाठी जागा देण्यात यावी. उल्लेखनिय कामगीरी करणा-या कर्मचा-यांना बक्षिस देण्याची तरतुद करण्यात यावी. शहरात रस्त्यावर लोक भाजी विक्रीसाठी बसतात त्यामुळे रहदारीस अडथळा होतो. मुकुंदनगर साठी भाजी मार्केटची तरतुद केलेली असुन इतरही ठिकाणी उपनगरात पालिकेच्या जागेवर भाजी मार्केट उभारणे संदर्भात तरतुद करण्यात यावी. महानगरपालिका हद्दीतील बरेचशे विद्यार्थी स्पर्धात्मक परिक्षेसाठी परिक्षेची तयारी करतात अशा विद्यार्थ्यांसाठी महानगरपालिके तर्फे अभ्यासिकेची सुविधा देण्यात यावी. यासाठी एखादा हॉल महानगरपालिके तर्फे उपलब्ध करुन देण्यात यावा. दिनांक ३१ मार्च पुर्वी जे मालमत्ता धारक त्यांचेकडील संपुर्ण रक्कम महानगरपालिकेकडे जमा करतील त्यांची नोटीस फी रद्द करण्यात येईल असे महानगरपालिके तर्फे जाहीर करण्यात आले आहे. नागरिकांना दिल्या जाणा-या बिलात नोटीस फी ॲड होवुन येते. ती येणार नाही. यादृष्टीने कारवाई करण्यात यावी. घरपट्टीचा भरणा करण्यासाठी नागरीक कार्यालयात गेल्यानंतर त्यांना बसण्यासाठी जागा नसते अपुरा कर्मचारी वर्ग यामुळे बराच वेळ जातो. याकरीता  नागरी बँका शेड्युल बँका मध्ये टॅक्स जमा करुन घेणेबाबत  तरतुद करण्यांत यावी. मालमत्ता हस्तांतरण फी ही जास्त लावण्यात आली आहे, ती कमी करण्यात यावी. नुकतीच पिंपरीचिंचवड महानगरपालिकेला महिलांच्या नांवे असणा-या मिळकतीवर ५ टक्के सुट दिली आहे. त्याचपध्दतीने आपल्या महानगरपालिकेने तसा ठराव करावा. महिला सक्षमीकरणासाठी असा ठराव करण्यास काहीच हरकत नाही. उणाड कुत्र्या संदर्भात महानगरपालिके तर्फे लाखो रुपये खर्च करण्यात येतात परंतु आजही शहरात गल्लोगल्ली कुत्रे फिरतांना दिसतात. या कामासाठी होणारा खर्च हा बोगस आहे. ठेकेदार व प्रशासन यांचे लागे बांधे आहेत असा माझा आरोप आहे. तसेच रक्तपेढी संदर्भात सुधारणा करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या वतीने रक्तदान शिबिर देण्यासंदर्भात मी सर्व नगरसेवकांना आव्हान करतो. महानगरपालिका ॲब्म्युलन्सची अवस्था तसेच वाहनांची अवस्था अत्यंत खराब आहे. सिनानदीतील अतिक्रमण काढणे संदर्भात तरतुद केलेली आहे. आपलेच अतिक्रमण आपणच काढायचे यासाठीची तरतुद इतर ठिकाणी वापरण्यात यावी. टँकरसाठी ९० लाखाची तरतुद केलेली आहे. महानगरपालिकेने स्वत:चे टँकर खरेदी करावेत. चौक सुशोभिकरणासाठी जी तरतुद करण्यात आलेली आहे ती कमी करण्यात यावी. विविध बँका, स्वयंसेवी संस्था, कारखानदार यांना आवाहन करुन सदरचा खर्च करण्यात यावा. अधिकारी निवासस्थान बांधणेसाठीची तरतुद वाढविण्यात यावी. मा.स्थायी समिती सभापती करीता निधी नसावा. एनर्जी ऑडीट झ्ाले का याबाबत माहिती देण्यात यावी. दिव्यांसाठी कोणताही टाईम लिमीट नाही. दिवे हे रात्रीनंतर एका आड एक चालू एक बंद अशा प्रकारे दिवे ठेवल्यास वीज बिलात बचत होवु शकते. पोलवर नंबर टाकण्यात यावेत. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी तरतुद करण्यात आलेली आहे. दरवर्षी तरतुद करण्यात येते. आश्वासने दिली जातात. पण कामे होत नाहीत. सुधारणा जर होणार नसतील तर दरवाढीचा फेरविचार करणेत यावा. दिल्लीगेट नेहरुमार्केट गाळे धारकांचा

सहानुभुतीपूर्वक विचार करावा. महानगरपालिकेचे बरेच ओपन स्पेस आहेत. त्याला तार कंम्पौंड करुन घेण्यात यावेत. या बजेटमध्ये त्यासाठी तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.शेख आरीफ शेख रफीउद्दीन :- मोबाईल टॉवरवर दुप्पट दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. २००८ साली ठराव होवूनही मोबाईल कंपन्या टॉवर नियमीत न करता त्याचा अनधिकृत वापर करीत आहेत. याचा विचार करुन दंडात्मक कारवाईसाठी सूचविलेल्या वाढीमध्ये जोपर्यंत मोबाईल टॉवर कंपन्या अनधिकृत वापर चालू ठेवतील तोपर्यंत त्यांना प्रत्येक वर्षासाठी नियमित करेपर्यंत रु१.५० (रुपये एक लाख पन्नास हजार) दंडात्मक आकारणी करण्यात यावी. नियमिती करण करण्यासाठी रु१.५० (रुपये एक लाख पन्नास हजार) शुल्क आकारण्यात यावे.

**मा.सौ.मालन ढोणे :-** मा.महापौर निधीची तरतुद नियमाला डावलुन घेतली आहे. यासंदर्भात वृत्तपत्रात आलेली बातमीचा खुलासा करण्यात यावा.

**मा.आयुक्त साो :-** यापुर्वीही मा.स्थायी समिती मध्ये प्रशासनाने भुमिका स्पष्ट केली आहे. सदरचा निधी ठेवण्यात येवू नये अशी भुमिका मांडण्यात आली आहे.

**मा.सौ.शारदा ढवण :-** सावेडी उपनगरातील रस्त्यासंदर्भात केलेल्या उपोषणाच्या वेळी सर्व कामे दोन महिन्यात करण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले. परंतु मा.स्थायी समिती कडुन ही कामे वगळण्यात आली. तरी खालील रस्त्यांचा अंदाजपत्रकात समावेश करण्यात यावा.

| | |
|---|---|
| १ | तपोवन रोड ते गावडे मळा ते पिंपळगांव रस्ता असा शिवरस्ता व जोडरस्ता मजबुतीकरण करणे व डांबरीकरण करणे. |
| २ | पाईपलाईन रोड ते तपोवन रोड (साई श्रध्दा कॉलनी ते कादंबरी फेज २ पर्यंतचा रस्ता) मजबुतीकरण करणे व डांबरीकरण करणे. |
| ३ | पाईपलाईन रोड वरील कादंबरी फेज १ ते तपोवन रोड पर्यंतचा रस्ता मजबुतीकरण करणे व डांबरीकरण करणे. |
| ४ | राजनगर, ढवणवस्ती अंतर्गत ड्रेनेज पाईपलाईन टाकणे. |
| ५ | गावडेमळा व कसबे मळा या शिव रस्त्यावरील व नाल्यावरील पडावयास आलेल्या पुलाचे नुतनीकरण व मजबुतीकरण करणे. |

याबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.श्रीमती. गंभीर इंदरकौर किसनसिंग यांनी प्रभाग क्रमांक १९ मधील खालील अत्यावश्यक कामे करणे बाबत मा.महापौर साहेब यांचेकडेस यादी देण्यात आली.

| | |
|---|---|
| १ | तारकपुर इंदीरा कॉलनी मधील अंतर्गत भागातील ३०० व्यासाची बंद पाईप गटर करणे. |
| २ | सिव्हील हडको अंतर्गत भागात ४५० व ३०० एम.एम.व्यासाची बंद पाईप गटर करणे. |
| ३ | चिनी टेलर ते सचीन एजन्सी ते मेन नाला पर्यंत ३०० एम.एम.व्यासाची आर.सी.सी.पाईप गटर करणे. |
| ४ | गुरुप्रसाद बुक स्टॉल ते राधास्वामी मंदिर ते पंजाबी हॉल पर्यंत रस्ते डांबरीकरण करणे. |
| ५ | सिव्हील हडको अंतर्गत भागात रस्ते डांबरीकरा करणे. |
| ६ | मेघाग्नी चौक ते साधु वास्वानी कॉलनी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| ७ | प्रकाशपुर भागातील रस्ते डांबरीकरण करणे. |
| ८ | तारकपुर भागातील मेन रोड ते काकडे घरापर्यंत रस्ते कॉक्रीटीकरण करणे. |
| ९ | सिव्हील हडको भागात अरुंद रस्ते कॉक्रीटीकरण करणे. |
| १० | तारकपुर येथील अस्थित्वातील नाला ठिकठिकाणी तुटला आहे तरी सदरचा नाला दुरुस्त करुन उंची वाढविणे व पी सी सी करणे बाबत. |

**मा.आयुक्त सो :-** उपोषणाच्या वेळी आपणांस दिलेल्या आश्वासनांचा प्रशासनाने मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर केले परंतु स्थायी समिती मध्ये या कामांचा समावेश करण्यात आलेला नाही. मा.महापौर साहेब यांना विनंती अंदाजपत्रकाच्या विषयावर चर्चा चालू आहे. यावर त्यांनी निर्णय घ्यावा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** केडगांव मध्ये स्विमींग टँक्स करणे संदर्भात मा.श्री.चोपडा यांनी मागणी केली पण आगोदर केडगांवसाठी पिण्याचे पाणी द्या मग टँकचा विचार करा. मिस्कीननगर जॉगिंग ट्रॅकवर मा.आयुक्त साहेब यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले परंतु आज तेथे एकही झाड अस्तित्वात नाही. वृक्षारोपणासाठी ६ लाखाची तरतुद केली आहे. वृक्षारोपण करा पण त्यासाठी ट्रीगार्ड ची व्यवस्था करा. ट्रीगार्ड शिवाय वृक्षारोपण यशस्वी होणार नाही. माझ्या प्रभागात स्थानिक नागरिकांकडुन ट्रीगार्ड मिळवुन यशस्वी वृक्षारोपण करण्यात आले आहे. एडस् विषयी सर्वत्र जनजागरण मोठया प्रमाणावर होत असल्याचे निदर्शनास येते परंतु महानगरपालिके तर्फे काहीही होतांना दिसत नाही. यासाठीची तरतुद वाढविण्यात यावी. पुढच्या भावी पिढीसाठी हे होणे आवश्यक आहे. पुढील सर्वसाधारण सभा ही येथे न होता जुन्या महानगरपालिका सभागृहात घेण्यात यावी. यासाठी लेखी पत्र आम्ही देत आहोत.

**मा.आयुक्त सो :-**एडस् च्या जनजागृती बाबतीत तरतुदीत वाढ करण्यात येईल व पुढील मिटींग जुन्या सभागृहात घेण्यात येईल.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** वृत्तपत्रात नोटीस फी माफी संदर्भात निवेदन वाचण्यात आले याबाबत खुलासा करावा. नागरिकांनी रक्कम भरुनही पुढील वर्षी त्यांचे बिलात थकबाकी लावुन येते तरी संबंधितांना रक्कम भरल्यानंतर थकबाकी निरंक (शुन्य) येणे संदर्भात सूचना देण्यात याव्यात.

**मा.आयुक्त सो :-** यापुर्वी ज्या नागरिकांनी त्यांचेकडील संपुर्ण थकबाकी नोटीस फी वगळुन व नोटीस फी सह महानगरपालिकेकडे जमा केलेली आहे. व अशा नागरिकांनी नोटीस फी संदर्भात अर्ज केले आहेत. अशांना टप्प्याटप्याने नोटीस फी माफी दिली आहे. नागरिकांमध्ये यासंदर्भात संभ्रम निर्माण होतो. याकरीता नागरिकांनी कुठल्याही प्रकारचा अर्ज न करता संपुर्ण रक्कम जमा केल्यास त्यांची नोटीस फी माफ करण्यात येईल. याबाबत संबंधितांना आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत.

**मा.श्री.संदिप कोतकर :-** बजेट मध्ये स्थायी समितीने ज्या तरतुदी सुचविल्या त्यानुसार केडगांव पाणीपुरवठा योजना, शहर पाणीपुरवठा योजना यासाठी किती निधीची तरतुद महानगरपालिकेस उभी करावी लागेल. व दुस-या बाजुला वाढीव आस्थापना खर्च पाहता ही तरतुद कशी करणार आपण फक्त तरतुद करतो. फुगीर बजेट करु न उपयोग नाही. वैद्यकीय प्रतिपुर्तीच्या रु ४० हजार पुढील प्रकरणा संदर्भात किती प्रकरणे मा.शासनाशी या संदर्भात पत्र व्यवहार करावा. रु ४० हजारावरील खर्च मंजुरीचा अधिकार तुमच्याकडे घ्या. शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, महापौर निधी, रस्ते पॅचिंग, चौक सुशोभिकरण, आस्थापना खर्च याचा आढावा घेतला असता महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती ही खर्च भागवु शकत नाही. भविष्यात महानगरपालिकेचे प्लॉट विकुन कर्मचा-यांचे पगार करावे लागतील. मागील कामांचे बिल अजुन निघत नाहीत.

**मा.आयुक्त सो :-** यापुर्वी सुध्दा अशा प्रकारचे बजेट मंजूर केले तर आगामी दोन वर्षात कर्मचा-यांचे पगार सुध्दा करु शकत नाही. ९० ते ९५ कोटी शासनास महानगरपालिका हिस्सा द्यावयाचा आहे. आपले उत्पन्न पाहिले तर स्थायी समिती कडून जकातीचा ठेका कमी करुन द्यावा लागता महापौर निधीची तरतुद कुठेच नाही हा निधी ठेवणे योग्य नाही. जवळजवळ १४ कोटींची तरतुद वाढली आहे ही रक्कम कोठून उभारणार याचा बजेटमध्ये कोठेच उल्लेख नाही. पुढे मात्र निश्चित अडचणी येणार आहेत. केडगांव पाणी पुरवठा योजनेच्या साठी Asset and Laibilities Statement द्यावयाचे आहे ते पाहिले तर कोणतीही संस्था कर्ज देणार नाही यासाठी वाढविलेल्या रक्कमा कमी कराव्या लागतील.

**मा.श्री.संदिप कोतकर :-** योजनेसाठी पैसे उपलब्ध झाले नाही तर प्रकल्प अर्धवट राहतील केडगांव पाणीपुरवठा योजनेचे १३ x  मिटरचे काम झाले आहे उरलेले ८०% काम बाकी आहे. टाक्या पुर्ण झालेल्या नाहीत तोच पाईपची मागणी करण्यात आली फक्त टी साठी दोन महिने लागतात येत्या १२ तारखेस योजनेचे उद्‌घाटन होणार आहे त्यापुर्वी काम झाले पाहिजे दिवसाआड केडगांवकरांना पाणी पुरवठा होवू शकला तर टँकरची आवश्यकता राहणार नाही. टाक्यांचा ठेकेदार बदलण्याबाबत स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. असे असतांना पाईपची ऑर्डर का दिली ?

**श्री.निकम मेकॅनिकल इजिनिअर :-** केडगांव पाणी पुरवठा योजनेचे काम जवळ जवळ पुर्ण झाले आहे. क्रॉस कनेक्शनचे काम सुध्दा दोन तीन दिवसात होईल. १२ तारखेपर्यंत पूर्ण होईल. ट्रायल झालेली आहे. डिस्ट्रीब्युशनचे पाईप टाकुन उपयोग नाही सर्व पाईपची ऑर्डर दिली आहे.

**मा.श्री.संदिप कोतकर :-** केडगांवचे ६ झोन केले आहेत आमची मागणी की प्रत्येकी झोन निहाय पाईप मागविणे. टाक्याचे कामाबाबत काम प्रगती पथावर आहे. यासाठी टाईम ॲड प्लॅनिंग करा अडचण येणार नाही.

**श्री.निकम मेकॅनिकल इंजिनिअर :-** त्याप्रमाणेच काम चालू आहे. टाक्याचे पहिल्या स्लॅबचे काम झाले आहे.

**मा.श्री.संदिप कोतकर :-** शिक्षण मंडळातर्फे सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत काही खोल्यांचे काम चालू आहे. शाळांची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. या शाळावर कंत्राटी बेसीसवर स्टाफ आहे. त्यामुळे शाळांच्या दर्जावर परिणाम होत आहे. जिल्हा परिषदेकडील शाळा महानगरपालिकेकडे घेण्याबाबत मा.शिक्षणमंत्री यांचेकडेस पत्रव्यवहार करण्यात यावा.

**श्री.शिदोरे प्रशासनाधिकारी :-** सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत वाढीव भागामध्ये नविन ३ शाळांच्या ५ खोल्या झ ााल्या आहेत. कंत्राटी पध्दतीने आपण एकही कर्मचारी नेमलेला नाही. मा.शासनाचे नियमानुसार सेवकांची नेमणूक केली आहे.

**मा.आयुक्त सो :-** हा विषय सगळ्या शहरांमध्ये आहे. ज्या शाळा जिल्हा परिषदेच्या ताब्यात आहेत अशा शाळांसाठी १०० टक्के अनुदान सरकारने दिले पाहिजे या शाळातील कर्मचा-यांचे पेन्शन ग्रॅज्युएटी यावर महानगरपालिका खर्च करुशकत नाही.

**मा.श्री.संदिप कोतकर :-** नगरसेवकांच्या नगरसेवक निधीतुन अशा शाळांना जर बेंचेस पुरविले तर काय हरकत आहे. बेंच पुरविण्याबाबत परवानगी महानगरपालिकेने द्यावी. अंगणवाड्या करीतांही सुविधा पुरविणे संदर्भात नगरसेवक निधीतुन करण्यास मंजूरी मिळावी अशी मी मागणी करतो.

**श्री.शिदोरे प्रशासनाधिकारी :-** तीन शाळा यावर्षी चालू केल्या आहेत. त्यासाठी बेंच खरेदी प्रक्रीया चालू केली आहे. ज्या जिल्हा परिषद शाळा आहेत अशा शाळांना बेंच पुरविणे बाबत ठराव घेण्यात यावा. महानगरपालिका हद्दीतील शाळांसाठी खर्च करता येईल.

**मा.श्री.नितीन शेलार :-** शालेय क्रीडा स्पर्धा महापौर चषक निधी यासाठी तरतुद करण्यात आली आहे. परंतु ती अपुरी आहे. तरी याबाबत खुलासा करण्यात यावा. गरीब खेळाडुंसाठी ५० हजारांची तरतुद करण्यात यावी. तसेच ऑलिपिंक खेळाडुंसाठी ५० हजार रुपयांची तरतुद केली आहे. यामध्ये ऑलिंपिक या शब्दाऐवजी आंतरराष्ट्रीय हा शब्द टाकण्यात यावा.

**श्री.मिसाळ क्रीडा विभाग :-** क्रीडा विभागाशी सल्लामसलत करुन सदरची तरतुद करण्यात आली आहे.

**मा.आयुक्त सो :-** मा.महापौर चषक निधीसाठी १० लाखाची तरतुद करण्यात आली असुन इतर स्पर्धा या क्रीडा अधिकारी किंवा क्रीडा विभागामार्फत आयोजित करण्यात येत असल्याने या तरतुदीमध्ये वाढ करणे संयुक्तीक वाटत नाही.

**मा.श्री.संदिप कोतकर :-** मा.शासन निर्णयाचे दिलेल्या निर्देशाप्रमाणे मिनी ऑलिंपिक साठी तरतुद करण्यात आली आहे.

**मा.श्रीमती.गंधे :-** प्रोफेसर कॉलनी डिव्हायडर बाबत वारंवार मागणी करुनही त्यावर काहीही कार्यवाही होत नाही याबाबत खुलासा करावा.

**श्री.मगर शहर अभियंता :-** ट्रॅफिकच्या दृष्टीने सदर ठिकाणी डिव्हायडर टाकणे योग्य नाही.

**मा.श्री.निखिल वारे :-** मा.शासनाच्या निर्देशानुसार एक किंवा दोन मुलींनंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रीयेसाठी विशेष निधी आपण यापुर्वी मंजूर केलेला आहे. या योजनेचा लाभ किती कुटुंबांना मिळाला याबाबत माहिती देण्यात यावी.

**डॉ.श्री.बोरगे :-** एस.सी. व एस.टी. कॅटेगरीतील एकही रजिस्ट्रेशन झालेले नाही. तसेच ओपन कॅटेगरीतील ८ लोकांचे रजिस्ट्रेशन झालेले आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** या बजेटमध्ये यासाठी किती तरतुद प्रस्तावित केली आहे.

**डॉ.श्री.बोरगे :-** तरतुद प्रस्तावित केली नाही.

**मा.श्री.निखिल वारे :-** अत्यंत महत्वाचा विषय असतांनाही यावर तरतुद केलेली नाही. तरी यासाठी तरतुद करण्यात यावी.

**मा.महापौर सो :-** तरतुद करणे बाबत कार्यवाही करण्यात येईल.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** तपोवन रस्त्यावरील लक्ष्मीनगर जवळ एका प्लॉट धारकाने रस्ता बंद केला असुन याबाबत महानगरपालिकेने काय कार्यवाही केली.

**श्री.बल्लाळ :-** सदर जागा खाजगी मालकीची असुन रस्त्यासाठी जागा संपादन करण्याबाबत सर्वसाधारण सभेचा ठराव झालेला आहे. महानगरपालिका आर्थिक स्वरुपात मोबदला देण्यास तयार आहे पंरतु सदर मालकाची मागणी टी.डी.आर.संदर्भात आहे.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** यावर महानगरपालिका काही कार्यवाही करणार आहे किंवा नाही याविषयी लवकर धोरण आखुन हा रस्ता नागरिकांसाठी कसा लवकर खुला करता येईल याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**मा.श्री.अनिल शेकटकर :-** या अर्थसंकल्पात काही गोष्टींकडे दुर्लक्ष झाले असुन त्याकडे मी लक्ष वेधू इच्छितो शहरामध्ये झोपडपट्टयांची वाढ होत आहे. दलित वस्ती सुधारणा अंतर्गत बराचसा निधी असतांनाही कामे अपुर्ण आहेत. प्रशासनाने असा प्रोजेक्ट राबवावा की प्रत्येक वर्षी दलित वस्ती निधी अंतर्गत नियोजित बांधकाम करावे. आज दलित वस्तीचा निधी कोठेतरी खर्च दाखविला जातो. त्यांच्याकडुन महसुलही मिळत नाही. महानगरपालिकेस महसुल कसा मिळेल याचे नियोजन करणे आवश्यक आहे. दलित वस्ती अंतर्गत सिध्दार्थनगर टाकी ४ महिन्यात कार्यरत कशी होईल यासाठी दलित वस्तीचा २८ लाखाचा निधी रद्द करुन या टाकीसाठी संपवेल व इतर बाबी करता येतील याबाबत आम्ही यापुर्वी सूचना केल्या होत्या. तरी या प्रस्तावाचा विचार व्हावा व मा.जिल्हाधिकारी सो, यांचेकडेस पाठविलेला प्रस्ताव रद्द करणेत यावा अशी मी मागणी करतो.

**मा.महापौर सो :-** प्रस्ताव रद्द करता येणार नाही. टाकीसाठी वेगळी तरतुद करण्यात येईल. मा.शासनाकडुन घरकुलासाठी निधी उपलब्ध होतो. त्यासाठी प्रशासनाकडुन कार्यवाही होत नाही.

**मा.सौ.उनवणे :-** आम्ही दलित वस्ती निधी संदर्भात मुद्दा उपस्थित केला त्याचा खुलासा करा ?

**मा.महापौर सो :-** कालच या संदर्भात आपणास आश्वासन देण्यात आले आहे.

**मा.श्री.संजय चोपडा :-** गाळा हस्तांतरण फी मध्ये जी वाढ सुचविण्यात आली आहे ती अत्यंत अवाजवी असुन ती कमी करण्यात यावी.

**मा.आयुक्त सो :-** गाळे हे आपण बेरोजगारांना देतो पण सदर गाळे हे परस्पर विकले जातात. असे परस्पर हस्तांतर होवू नये याकरीता ही तरतुद करण्यात आली आहे.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** यशोदानगर मधील विहिरीतील गाळ काढणे संदर्भात तरतुद करण्यात यावी. गावडे मळ्याजवळील नाला आहे. पावसाळ्यामध्ये या नाल्यावर पुल नसल्याने नागरिकांचा संपर्क तुटून वाहतुकीस अडथळा येतो. तरी या नाल्यावर सी डी वर्क साठी तरतुद करण्यात यावी. बहुतांश ठेकेदार यांनी गेल्या वर्षभरात कामे केली या कामांचे देयक अद्यापपर्यंत अदा झालेले नाही. तरी ठेकेदारांची थकीत बिले कशी निघतील यादृष्टीने विचार व्हावा.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** सभागृहात काय चर्चा चालू आहे याबाबत काहीही कळत नाही. व्यवस्थित ऐकु येत नाही. गुलमोहोर पार्क जवळील प्लॉट धारकाने रोड बंद केला आहे. याबाबत खुलासा करावा. या प्लॉटवर आगोदर डब्ल्यु बी एम झालेले आहे. रोड करण्यापुर्वी जागा कोणाची आहे हे पाहणे आवश्यक असतांना रोड कसा करण्यात आला.

**श्री.बल्लाळ :-** डी. पी मध्ये १५ मिटर रस्ता आहे. परंतु मुळ मालक मे.कोर्टात गेलेले असुन कोर्टाने आपल्या विरुध्द निकाल दिलेला आहे. जमिनीच्या हद्दीबद्दल वाद आहे. टी डी आर च्या माध्यमातुन जागा देण्यास जागा मालक तयार आहे.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** गणवेश खरेदी करता किती तरतुद करण्यात आली आहे. आपल्याकडे कर्मचारी गणवेश घालत नाहीत.

**मा.आयुक्त सो :-** कर्मचा-यांना गणवेश देण्यात येतात. व गणवेश न वापरात असलेबाबत आढळुन आल्यास अशा कर्मचा-यां विरुध्द संबंधितांकडुन दंड आकारणी केली जाते.

**मा.श्री.कवडे :-** पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचे लालटाकी येथील पुतळ्या जवळ अनधिकृतपणे म्हशींचा गोठा करण्यात आला आहे. तसेच तोफखाना भागातील कारंजाचे जागेमध्ये अनधिकृत व्यवसाय चालू आहे. याबाबत आपण कार्यवाही का करीत नाही.

**श्री.बल्लाळ :-** सदर कारंजाची जागा ठाकुर कुटुंबियांची असुन या जागेला त्यांचे नांव लावणे बाबत सिटी सर्व्हेला वाद चालू असुन महानगरपालिके तर्फे याबाबत हरकत घेण्यात आली आहे.

**मा.श्री.सचिन पारखी :-** स्पर्धा परिक्षेसाठी ६ लाखांची तरतुद केली आहे ती अत्यंत तोकडी आहे. सदरची तरतुद ही वाढविण्यांत यावी. व स्पर्धा परिक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांना लॅपटॉप, इंटरनेट सारख्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. संगणक खरेदी पान नंबर ६४ वर तरतुद १७ लाख केली आहे. ई गव्हर्नस चे काम झालेले असुन एवढया तरतुदीची आवश्यकता नाही. तरी सदर तरतुद कमी करुन ती स्पर्धा परीक्षेसाठी वर्ग करण्यात यावी.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** केडगांव पाणी पुरवठया साठी ७ कोटी रुपयांची तरतुद केल्याबद्दल सर्व सभागृहाचे केडगांवकरांच्या वतीने आभार मानतो. तसेच केडगांव भुयारी गटार योजना आय.एच.एस.डी.पी. व इतर मोठमोठया योजनांवर नियंत्रणासाठी अभियंता नाही. तरी अभियंत्यांची नेमणुक करण्यात यावी. सीनानदी सुशोभिकरणाचे अतिक्रमण हटविण्यासाठी जी तरतुद केली आहे. ती पाहता आपलेच अतिक्रमण काढण्याची वेळ आपल्यावर येवू नये शहराचा पैसा वाया जावू नये याबाबतची खबरदारी घेण्यात यावी. केडगांवच्या पाण्याचे टाकीचे काम थांबले आहे. चौकशी करता टाक्यांच्या कामासाठी वापरण्यात येणारे स्टील चेक करण्यासाठी सदरचे काम थांबविले आहे असे समजते. कामाचे श्रेय कोणीही घ्या परंतु काम थांबवू नका. मागीलवर्षी शववाहिका खरेदी साठी तरतुद केली होती. परंतु स्थायी समितीने ५ लाख तरतुद दर्शविली आहे. केडगांव साठी शववाहिका उपलब्ध करून द्यावी. केंद्र व राज्य सरकार निधी

अंतर्गत बरीच कामे शहरात चालू आहेत. या कामांवर देखरेखीसाठी सर्व पक्षिय समिती नेमण्यात यावी. जेणेकरुन सदरची कामे ही गुणवत्तापुर्ण व दर्जेदार कामे होतील. शहर बससेवा ही प्रभाग क्रमांक ६२, ६३ व सर्व उपनगरामध्ये देण्यात यावी. केडगांव मध्ये अनेक कामे मंजूर झाली परंतु अद्यापही ती सुरु झालेली नाही. प्रभाग समिती स्थापन करा त्यांना आर्थिक अधिकार द्या जेणेकरुन प्रभाग पातळीवर निर्णय होवून कामे मार्गी लागतील. महानगरपालिका शाळांना संगणक उपलब्ध करुन देण्यात यावेत.

**मा.श्री.आरीफ शेख :-** सन २०११-२०१२ च्या अंदाजपत्रकावर बरीचशी चर्चा झाली सदस्यांनी आपले विचार मांडले असुन हे अंदाजपत्रक मंजूर करावे अशी मी मागणी करतो.

**मा.महापोर सा़ो :-** सर्वांनी आपआपल्या परीने सूचना मांडल्या आपल्या सूचनांचा विचार करुन योग्य ते बदल केले जातील.

**मा.महापौर साहेब यांचे मनोगत**

**।। नमस्कार ।।**

अहमदनगर शहराचे ग्राम दैवत श्री. विशाल गणपती व राष्ट्रसंत श्री आनंदऋषीजी महाराज साहेब यांच्या कृपाआर्शिवादाने, फुले,शाहु,आंबेडकर विचार प्रवाहातून समाजातील प्रत्येक घटकापर्यत महानगरपालिकेच्या माध्यमातुन कार्य करण्यासाठी आदरणीय भारताचे कृषी मंत्री मा.ना.श्री. शरदचंद्रजी पवार साहेब, केंद्रीय ग्रामविकासमंत्री मा.ना.श्री.विलासरावजी देशमुख साहेब, केंद्रीय नगर विकास मंत्री मा.ना.श्री जयपाल रेडडी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा व उर्जा मंत्री मा. ना.श्री अजितदादा पवार साहेब, नगरविकास राज्यमंत्री मा.ना.श्री. मा.ना.श्री.भास्कररावजी जाधव साहेब, पालकमंत्री तथा अदिवासी विकास मंत्री मा.ना.श्री बबनरावजी पाचपुते साहेब, कृषीमंत्री मा.ना.श्री बाळासाहेब थोरात साहेब, मा.खा.श्री.गोविंदरावजी आदिक साहेब, मा.आ.श्री.अरूणकाका जगताप साहेब, मा.आ.श्री शिवाजीराव कर्डीले साहेब, कॉंग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष मा.श्री भानुदासजी कोतकर साहेब तसेच शहराचे माजी आमदार मा.श्री.दादाभाउत्र कळमकर साहेब यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली त्याच प्रमाणे सहकारी नगरसेवक, नगरसेविका आपणा सर्वाचे मार्गदर्शन व सहकार्य तसेच अधिकारी व कर्मचारी वर्गाचे सर्वतोपरी सहकार्य तसेच सर्व पत्रकार यांचे सहकार्य मला कामकाज करतांना मिळत आहे, याचा मनस्वी आनंद होत असुन मी अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०११ - २०१२ या आर्थिक वर्षाचे अंदाज पत्रक घेउत्न आपणा समोर येत आहे.

या आर्थिक वर्षामध्ये नागरी सुविधेच्या दृष्टीने तसेच जुने शहर आणि उपनगराच्या सर्वागीण विकासाच्या दृष्टीने व आपणा सर्वांच्या कल्पनेतले स्वच्छ व सुंदर महानगर करण्यासाठी जास्तीत जास्त कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे. त्याच प्रमाणे शहराच्या वैभवात भर घालणारे मिस्कीनमळा गंगा उद्यान प्रकल्प खाजगी करणाच्या माध्यमातून देखभालीसाठी देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून लवकरच सदर उद्यान लोकार्पण करण्यात येणार आहे.

- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विविध महत्वाचे नागरी रस्ते व पुल करणे बाबतचे सुधारित प्रकल्प अहवाल योजनेचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविला आहे. लवकरच मा.शासनाकडून यासाठी निधी उपलब्ध होणार आहे. शहराच्या दृष्टिने नागरी सुविधा विकास प्रक्रियेला चालना देणारे महत्वपूर्ण प्रकल्पांचा यात समावेश आहे. सदरचे प्रस्ताव पुढील प्रमाणे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (लाखात) |
|---|---|---|
| १ | यश पॅलेस ते कोठी रस्त्याचे रूंदीकरण, मजबुतीकरण,विद्युतीकरण व | २१९३.०४ |

| | | |
|---|---|---|
| | कॉक्रीटीकरणासह इतर सुधारणा करणे. | |
| २ | बालिकाश्रम रस्त्याचे रूंदीकरण , डांबरीकरण ,गटार व फुटपाथसह विद्युत व्यवस्थेसह काम करणे. | ९८६.८९ |
| ३ | पाईप लाईन रस्त्यावरील मनमाड रस्त्याजवळील पुलाचे रूंदीकरण करणे रस्त्याच्या मध्यभागी विद्युतीकरण करणे. | १६९.५० |
| ४ | मनमाड रोड सत्यम हॉटेल ते भुतकरवाडी पंपींग स्टेशन पर्यत रस्त्याचे रूंदीकरण , मजबुतीकरण, डांबरीकरण पुलाच्या कामासह करणे | ५४१.११ |
| ५ | महानगरपालिका हद्दीतील विद्युत उर्जा बचत पथदिवे संच बसविणे (सक्षमीकरण ) | ३३०.०० |
| ६ | नगर पुणे रस्त्यावरील केडगांव रेल्वे उड्डान पुल ते केडगांव रेणुकादेवी मंदिरापर्यत रस्त्याचे पुलाच्या कामासह रूंदीकरण करून डांबरीकरण करणे. | ९५६.०२ |
| ७ | प्र.क्र. ५१ व ५२ मध्ये अंतर्गत भागात नविन टयुबलर पोल, अंडरग्राउंन्ड केबल व एनर्जी सेव्हींग स्ट्रीट लाईट फिटींग बसविणे | ११८.०० |
| ८ | लालटाकी नेहरू पुतळा ते सर्जेपूरा चौक ते रामवाडी ते फलटण पोलिस चौकीपर्यत रस्त्याचे रूंदीकरण , डांबरीकरण आवश्यक त्या ठिकाणी फुटपाथ व विद्युतीकरणासह करणे. | ५१३.६२ |
| ९ | अमरधाम रस्त्यावरील वेताळबाबा मंदिर ते एम.एस.ई.बी. सबस्टेशन पर्यत रस्त्याचे रूंदीकरण, मजबुतीकरण, डांबरीकरण ,विद्युतीकरणासह करणे. | ९८.७ |
| १० | महानगरपालिका हद्दीतील लक्ष्मीनगर, हिम्मतनगर या भागात नविन टयुबलर पोल, अंडरग्राउंन्ड केबल व एनर्जी सेव्हींग स्ट्रीट लाईट फिटींग बसविणे | १६.५० |
| ११ | महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये विविध ठिकाणी टयुबलर पोल, अंडरग्राउंन्ड केबल व एनर्जी सेव्हींग स्ट्रीट लाईट फिटींग बसविणे. | १५१.०० |
| १२ | औरंगाबाद रस्त्यावरील वन विभागापासून शहा शरीफ दर्गापर्यत रूंदीकरणासह डांबरीकरण व विद्युतीकरण करणे. | ३६७.१८ |
| १३ | औरंगाबाद रोड वरील हायवे ते जुने ग्रामपंचायत ऑफिस ते संजोगनगर कोप-या पर्यत रस्त्याचे रूंदीकरणासह डांबरीकरण करणे (सदर रस्त्यावरील पक्क्या घरांचे अतिक्रमण काढणे आवश्यक आहे.) | ५६४.९१ |
| १४ | मुकुंदनगर गोविंदपूरा ते कॅन्टोमेंट नाल्यापर्यतच्या रस्त्याच्या बाजूने पावसाचे पाणी जाण्यासाठी आरसीसी पाईप गटर करणे | १२४.४१ |
| १५ | मनपा हद्दीतील प्रेमदान चौक, सक्कर चौक, एस.टी. स्टॅण्ड चौक, मार्केट यार्ड चौक, चांदणी चौक, अप्पू हत्ती चौक, राज चेंबर चौक या ठिकाणी अद्यावत स्वयंचलीत नविन सिग्नल बसविणे | ३८.५० |
| | एकूण रक्कम | ७१३९.६५ |

- सिनानदी सुशोभिकरणासाठी मा. शासनाचे १ कोटी २५ लक्ष रुपये प्राप्त झालेले असून त्यामध्ये मनपाचे २५ लक्ष रुपये हिस्सा टाकून १ कोटी ५० लक्ष रुपयाचे काम प्रगती पथावर आहे. कॅबेन वॉल बांधणेचे काम सुरू आहे.

- शहराच्या नागरी विकासाला चालना देणारी शहर सुधारित पाणी पुरवठा योजना (फेज -२) या रूपये ११६.०७ कोटी योजनेचे कामास सुरूवात झालेली असून ५ कि.मी. अंतराची मुख्य जलवाहिनी टाकणे , पंप मोटार्स उभारणे , नविन साठवण टाक्या बांधणे कामास या आर्थिक वर्षात गती देण्यात येणार आहे. या कारणाने अनेक वर्षाचा शहरामधील तसेच उपनगरामधील अनियमित पाणी पुरवठयाचा प्रश्न मार्गी लागणार आहे.
- सावेडी परिसरासाठी आरोग्याच्या दृष्टिने महत्वपूर्ण असणारी सावेडी भुयारी गटार योजना सुमारे रू.६४.४१ कोटी रूपये खर्चाची असून सदरचा प्रस्ताव निधी उपलब्धतेसाठी मा.केंद्रशासनाकडे सादर केला असून त्याचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. व त्यासाठी मा.केंद्रीय मंत्रालयाकडे विशेष प्रयत्न सुरू आहेत.
- मा.केंद्र शासनाच्या यु.आय.डी. एस.एस.एम.टी योजने व्दारे चालु असलेल्या केडगांव पाणी योजनेचे संपूर्ण काम लवकरात लवकर करण्याचा मानस आहे. या योजने करिता वाढीव रकमेपोटी लागणा-या रू. ७ कोटी अनुदान स्वरूपात महानगरपालिकेस मा.शासनाकडून लवकरच मिळणार असून उर्वरित रक्कम रू. ७ कोटी कर्ज स्वरूपात MUIDCL यांच्याकडून मंजूर करून आणणार आहे.
- अहमदनगर मधील खेळाडू पैकी ऑलंम्पिक खेळासाठी ज्या खेळाडूंची निवड होईल अशा खेळाडूंना खर्चासाठी अर्थ सहाय्य देण्याच्या दृष्टिने मिशन ऑलिंम्पिक चॅम्पियनशिप खेळाडूंना मदत या लेखाशिर्षा अंतर्गत याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
- नगररचना योजना क्र. ३ अंतिम भूखंड ९२ या जागेत (छत्रपती शिवाजी भाजी मार्केट ) येथे भाजी मंडई सह व्यापारी संकुल उभारणे तसेच प्रोफेसर कॉलनी चौक येथे भव्य व्यापारी संकुल व ऑफिसेस BOT / FBT या तत्वावर भव्य इमारत बांधण्याबाबत निविदा मागविण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
- नेहरू मार्केट सि.स.नं. २०८ या जागेमध्ये भाजी मंडई सह व्यापारी संकुल उभारणे BOT / FBT या तत्वावर दुकाने व ऑफिसेस करिता भव्य इमारत बांधण्याचा मानस असून त्याबाबत निविदा मागविण्यात आलेल्या आहे.
- अहमदनगर महानगरपालिकेत रक्तपेढी विभागात रक्त घटक निर्मिती सेवा प्रकल्प उभारणार असून यंत्र सामुग्री, इमारत सुसज्जीकरण , फर्निचर व आदी आवश्यक व्यवस्थेबाबत प्रशासनाने ६४ लक्ष रूपये खर्चाचा प्रकल्प प्रस्ताव तयार करणेत आला होता त्याच मा.महासभा , मा.स्थायी समितीने मान्यता दिलेली असून सुमारे ३० लक्ष रूपये खर्चाची यंत्र सामुग्री लवकरच खरेदी करणेत येणार आहे व पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. रक्त घटक निर्मिती सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांना औरंगाबाद, पुणे, शिर्डी येथे जावे लागणार नाही. यामुळे रूग्णावर तातडीने उपचार होवून वेळ व पैश्याची बचत होणार आहे याचा मला आनंद होत आहे.
- सावेडी उपनगरासाठी आरोग्य तपासणी व उपचार केंद्र सावेडी व्यापारी संकुलातील पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

- एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) अंतर्गत मोरचूद नगर सर्व्हे नं. ५ व नालेगांव सर्व्हे नं. २२०/२२१ येथे ४८० सदनिका बांधण्याचा प्रस्ताव म्हाडा मुंबई येथे मान्यतेसाठी पाठविला असून प्रकल्प मार्गी लागण्याच्या दृष्टिने पाठपुरावा केला जाईल. यास १२ कोटी ५० लक्ष रू. खर्च येणार आहे
- मा.केंद्र शासनाचे राजीव आवास योजना अंतर्गत अहमदनगर शहरातील संपूर्ण झोपडपट्टयाचे सर्व्हेक्षण करून झोपडपट्टयांचा सोशिओ इकोनॉमिक सर्व्हे , बायोमॅट्रीक सर्व्हे, जीआयएस, एमआयएस करण्यात येणार असून झोपडपट्टी मुक्त शहर संकल्पना राबविण्यात येणार आहे. सदर बाबत सर्व्हेक्षण करिता अंदाजे रू.३ कोटी ३४ लाख इतके अनुदान मनपास प्राप्त होणार आहे.

- मा.केंद्र शासनाच्या धोरणानुसार एकूण रू. ३३७ कोटी रक्कमेचा शहर स्वच्छता आराखडा तयार करण्यात आला असून यामध्ये शौचालय बांधणे, ड्रेनेज लाईन टाकणे, पावसाळी गटर बांधणे, घनकचरा व्यवस्थापन , मलनिस्सरण प्रक्रिया केंद्र बांधणे इ.बाबींचा सामावेश आहे. सदरचा शहर स्वच्छता आराखडा दिनांक २-४-२०११ रोजी मा.राज्यशासनाकडे सादर करण्यात येणार असून तदनंतर अंतिम मंजूरीसाठी मा.केंद्र शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.
- मा.केंद्र शासनाची एकात्मिक कमी खर्चाची शौचालय योजना (ILCS) अंतर्गत एकूण ५४३८ शौचालय बांधणे बाबत ५.४३ कोटी रकमेचा प्रस्ताव हुडको कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला आहे.
- अहमदनगर महानगरपालिकेचा अधिकृत मध्यवर्ती यांत्रिकी कत्तलखाना नसल्यामुळे अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये यांत्रिकी कत्तलखाना उभारणी बाबत व सदर कामी मा.जिल्हाधिकारी साहेब यांचेकडेस अनुदान प्राप्तीसाठी पाठपुरावा करण्यात येत असून त्यानुसार एकूण रू.२ कोटी अनुदान मनपास उपलब्ध होणार आहे.
- मा.राज्य शासनाचे सामाजिक न्याय विभागा मार्फत मागासवर्गीय व नवबौध्द घटकांकरिता घरकुल योजना राबविणे अंतर्गत एकूण १०४ घरकुल बांधून देणेबाबत मनपास एकूण १ कोटी ४३ लाख इतके अनुदानाचा पहिला हप्ता प्राप्त झालेला आहे. सदर बाबत घरकुल निर्माण समिती स्थापन करण्यात आली असून सन २०११-२०१२ मध्ये उपरोक्त योजने अंतर्गत १०४ लाभार्थींना घरकुल बांधून देण्यात येणार आहे.
- मा.शासनाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजने अंतर्गत महानगरपालिकेच्या सलग २५ वर्ष सेवेत असलेल्या सेवा निवृत्त कर्मचा-यांना अथवा अनुकंपा तत्वावरील कर्मचा-यांच्या वारसांना १६५ घरांची योजना मा.शासनाने मंजूर केली असून ४ कोटी ६३ लक्ष रू.खर्च येणार आहे. सदरची कार्यवाही लवकरात लवकर होण्याच्या दृष्टिने पाठपुरावा करण्यात येणार आहे.
- भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर व थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व परिसर सुशोभिकरण करणे करिता तरतुद करण्यात आलेली असून या कामास गती देण्यात येणार आहे.
- मा.महापौर दुर्धर रोग सहाय्यता निधी मधून मनपा हद्दीमधील जास्तीत जास्त गरजू रूग्णांना लाभ मिळावा याकरिता भरीव तरतूद करण्याचा मानस आहे.
- नागरी दलितवस्ती सुधार योजना शहरामध्ये प्रभावीपणे राबविली जावी यासाठी निधी मिळणे कामी मा.शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. त्यासाठी मा.शासनाकडून ७५ लक्ष रू. निधी मंजूर झाला असून यामधून लवकरच नागरी सुविधेची कामे हाती घेण्यात येणार आहे
- महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान नागरी भागातील अनुसूचित जाती व नवबोध्द घटकांमील कुटुंबियांना खाजगी नळ जोडणी व वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजना राबविण्याचा मानस असून या अंतर्गत लाभार्थींना शौचालय तसेच पिण्याच्या पाण्यासाठी वैयक्तिक नळ कनेक्शन तसेच सामुदायिक नळ कोंडा (स्टॅण्ड पोस्ट ) देण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.
- महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थाच्या कार्यक्षेत्रात नागरी पायाभूत व सामाजिक सुविधा निर्माण करणे व त्यांच्या बळकटीकरणासाठी जिल्हा योजने अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महअभियान (जिल्हास्तर) राबविण्याचा मानस असून यामध्ये नागरी सुविधेच्या दृष्टिने आवश्यक असणारे पुढील विकास कामे करण्यात येणार आहेत

१) एकविराचौक ते पारिजात चौक दरम्यानच्या रस्त्याचे रूंदीकरणासह मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.
२) मिस्किनमळा ते पंकज कॉलनी दरम्यानच्या रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे.
३) डौले हॉस्पीटल ते कुष्ठधाम , प्रेमदान हडको ते रासने नगर चौक, सोना नगर चौक ते भिडे हॉस्पीटल चौक व किंग कॉर्नर ते सोना नगर चौका पर्यत रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणे.
४) एकविरा चौक ते तपोवन रोड पर्यतच्या रस्त्याचे रूंदीकरणासह मजबुतीकरण करणे.
५) नगर मनमाड रोड ते ॲक्झिलियम स्कूल रस्ता डांबरीकरण करणे.
६) प्र.क्र. १९ मध्ये चिनी टेलर्स ते गंगा उद्यान पर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे.

- नगररचना विभागाचे माध्यमातून शहर विकास आराखडयाची अंमलबजावणी करणेसाठी विकास हक्क हस्तांतरण (TDR) सुरू करणेत आलेला आहे. त्यामुळे आरक्षणा खालील जागा मनपाच्या ताब्यात आलेल्या आहेत. तसेच समावेशक आरक्षण विकासाच्या माध्यमातून सुध्दा जागा मनपाच्या ताब्यात यत आहेत. तसेच मंजूर आराखडयामधील विकासाचे दृष्टिकोनातून आवश्यक असणारे फेरबदल मंजूर करून मा.शासनाकडे मंजूरीसाठी सादर केलेले आहेत.

- मा.महाराष्ट्र शासन यांचे निर्णया नुसार KDMC च्या धर्तीवर संगणक प्रणाली विकासीत करण्याचे काम चालू करण्यात आलेले आहे. सदर संगणक प्रणाली मध्ये चार प्रभागामध्ये "नागरीक सुविधा केंद्र " प्रस्थापित करण्यात येणार असून नागरिकांना या नागरिक सुविधा केंद्राद्वारे विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सदर कामी मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सर्व्हर रूम प्रस्थापित करण्यात आलेली असून चार प्रभाग समित्या २ MBPS च्या लिज लाईन द्वारे मुख्य सर्व्हर रूमशी जोडण्यात आलेले आहेत. सर्व प्रभाग समित्या येथे मा.शासनाच्या मार्गदर्शनानुसार संगणक व फर्निचरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली असून त्यासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणाली अंतर्गत नागरीकांच्या तक्रारी , टपाल आवक-जावक, जन्म-मृत्यू दाखले, घरपट्टी पाणीपट्टीच्या पावत्या, नळ जोडणी, इ. विविध स्वरूपाच्या सेवा देण्यात येणार आहेत.

- अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टिने व नागरी सुविधा कार्यक्रमामध्ये गतीमानता आणण्याकरिता कर्मचारी आकृती बंधास विशेष महत्व असून प्रशासनाने सादर केलेल्या आकृती बंधास मा.महासभेने गठीत केलेल्या कामकाज समितीने पुढील २० वर्षाची शहराची वाढ तसेच लोकसंख्या व त्यादृष्टिने आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग या बाबत विचार विनीमय करून सुचना व दुरूस्ती यासह आकृतीबंधाच्या प्रस्तावास मा.शासनाची मंजूरी घेवून लवकरच आकृतीबंध अंमलात आणला जाणार आहे.

सन २०११-२०१२ चे अंदाजपत्रक प्रशासनाने तयार करून मा.स्थायी समितीपुढे सादर केले आहे. मा.स्थायी समितीने दुरूस्त्या, सुचना व शिफारशीसह मा.महासभेपुढे सादर केले आहे. महानगरपालिका उत्पन्नाचे स्त्रोत व नागरी सुविधेचे प्रकल्प पूर्ण करण्याचे प्रबळ मनोइच्छा याची तोंड मिळवणी करत व शहर विकासाच्या दृष्टिने विकासाचा निश्चितच कार्यक्रम शहरवासियांसाठी राबविताना आपल्या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य याची नम्रपूर्वक अपेक्षा करित आहे. ते मार्गदर्शन व सहकार्य मला आपणा सर्वांनकडून निश्चित मिळेल या अपेक्षेसह उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व पत्रकार मित्र यांनी माझे मनोगत शांतपणे ऐकून घेतले याबद्दल आभार.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

---*---

## ठराव -

ऑफिस रिपोर्ट व मा.स्थायी समितीने दुरुस्ती केलेल्या शिफारशी तसेच महासभेपुढे झालेल्या चर्चेनुसार सन २०१०-२०११ चे सुधारित व सन २०११-२०१२ चे मुळ अंदाजपत्रकास आवश्यक दुरुस्ती व फेरफार करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सुचित केलेल्या कामांचे नियोजन योग्य रितीने व्हावे या दृष्टिने उपलब्ध तरतूदी मधून सदरची कामे प्राधान्याने हाती घेण्यात यावीत.

१) मा.श्री. निखील वारे , नगरसेवक यांनी दिलेल्या यादी प्रमाणे प्र.क्र. ७ येथील रिध्दी सिध्दी अपार्टमेंट ते श्री शेळके घर ते मार्कंडेय सोसायटी दरम्यान ४५० एमएम व्यासाची बंद पाईप गटर करणे या कामास रुपये १० लाखाची तरतुद करण्यात यावी.

२) मा.श्री.सतिष बारस्कर, नगरसेवक यांनी दिलेल्या यादी प्रमाणे प्र.क्र. २ मध्ये भिस्तबाग स.नं. ११,१२ व १३ या परिसरात अंतर्गत रस्ते करणे या कामास रु. २० लाखाची तरतूद करण्यात यावी.

३) मा.श्री.बाळासाहेब पवार, नगरसेवक यांनी दिलेल्या यादी प्रमाणे गावडे मळा नाला येथे सिडी वर्क (पुल )बांधणे या कामास रु. ५ लाखाची तरतूद करण्यात यावी.

४) मा.सौ.रजनी अरविंद शिंदे, नगरसेविका यांनी दिलेल्या यादी प्रमाणे बालिकाश्रम रस्त्याच्या डागडुजीसाठी व पॅचिंगसाठी रु. १० लाखाची तरतुद करण्यात यावी.

५) मा.श्री.शेख नजीर मोहम्मद नसीर , उपमहापौर यांनी दिलेल्या यादी प्रमाणे १.प्र.क्र. ६ मुकुंदनगर भागातील सी.आय.व्ही. कॉलनी मधील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे हे काम या आर्थिक वर्षात प्राधान्याने हाती घेण्यात यावे. २) प्र.क्र. ६ मुकुंदनगर भागातील सी.आय.व्ही. कॉलनी अंतर्गत ड्रेनेज लाईन करणे. हे काम या आर्थिक वर्षात प्राधान्याने हाती घेण्यात यावे. ३) प्र.क्र. ६ मुकुंदनगर भागातील दर्गा दायरा येथील अंतर्गत सिमेंट कॉक्रीटीकरण करणे हे काम या आर्थिक वर्षात प्राधान्याने हाती घेण्यात यावे.

६) मा.श्री.बाळासाहेब पवार, नगरसेवक व मा.सौ.रजनी अरविंद शिंदे, नगरसेविका, यांनी दिलेल्या यादी प्रमाणे मा.महापौर दुर्धर रोग सहाय्यता निधी मध्ये करण्यात आलेली रक्कम रुपये १० लाख ऐवजी १५ लाखाची तरतुद करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

७) मा.श्री.अनिल शेकटकर, नगरसेवक व मा.सौ.रजनी अरविंद शिंदे, नगरसेविका यांनी दिलेल्या यादी प्रमाणे विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देणे या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु.२५,०००/- ऐवजी रक्कम रु. ५०,०००/- करण्यात यावी यामधून मनपा कर्मचा-यांच्या पाल्यांकरिता इयत्ता १२ वी मध्ये जास्तीत जास्त गुण मिळविणा-या पाल्यास प्रथम रु. १०,०००/- द्बितीय रु.७,०००/- तृतीय रु. ५,०००/- व इयत्ता १० वी मध्ये जास्तीत जास्त गुण मिळविणा-या पाल्यास प्रथम रु. ७,०००/- द्बितीय रु.५,०००/- तृतीय रु.३,०००/- रोख रक्कम देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

८) मा.डॉ.सौ.क्रांतीकला रावसाहेब अनभुले, नगरसेविका यांनी दिलेल्या यादी नुसार प्रभागातील आवश्यक रस्ते व इलेक्ट्रीक व्यवस्था यांचा सर्व्हे तयार करून प्रस्ताव तयार करण्यात यावा.

९) मा.श्री. गणेश भोसले, नगरसेवक , मा.श्री.अनिल शेकटकर, नगरसेवक तसेच मा.सौ.रजनी अरविंद शिंदे, नगरसेविकास यांच्या यादी प्रमाणे समर्थ नगर येथील पाण्याची टाकी कार्यान्वीत करणेसाठी रक्कम रु.४० लक्ष तसेच सिध्दार्थ नगर येथील पाण्याची टाकी कार्यान्वीत करणेसाठी रक्कम रु. ३० लक्ष असे एकूण ७० लक्ष रु. तरतूद महापौर शहर विकास निधीमधून करणेत यावा.

१०) मा.श्री.संदिप कोतकर, माजी महापौर यांनी दिलेल्या यादी प्रमाणे केडगांव परिसरातील अंबिकानगर ते शाहू नगर बसस्टॉप पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामास रू.१० लाखाची तरतूद करण्यात यावी.

११) अलिकडे महानगरपालिका कामकाजात कार्यारंभ आदेश देण्यात येवून कामांची कार्यवाही केलेल्या काही देयकांचे बाबत थकीत देयका सुचिमध्ये समाविष्ट केले जाते, सभागृहामध्ये झालेली चर्चा पाहता सदर बीलामध्ये योग्य ती तरतूद ठेवावी. व थकीत बीलाची स्वतंत्र सुचि ठेवणेची पध्दत बंद करावी. कारण मा.सदस्य यांनी मांडलेल्या भावनांचा विचार करता तत्कालीन नगरपालिका व नव्याने स्थापन झालेल्या महानगरपालिकेपासून अर्थ विभागाकडे अशी पध्दत नव्हती. ही पध्दत अलिकडील काळात सुरु झाली आहे.

१२) मा.श्री.शेख आरिफ रफियोद्दीन, सभागृह नेता यांनी दिलेल्या यादी प्रमाणे प्र.क्र. २० मधील एरिगेशन गेट ते मौलाना आझाद शाळेपर्यतच्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे या कामास प्राधान्य देण्यात यावे.

१३) मा.श्रीमती गंभीर इंदरकौर किसनसिंग, नगरसेविका यांनी दिलेल्या यादीप्रमाणे प्र.क्र. १९ सिव्हील हडको मधील साक्षी किराणा स्टोअर ते वैष्णवमाता मंदिर, क्रांती चौक पर्यत ४५० एमएम व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे व अंतर्गत भागात ३०० एमएम व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे याकामास रक्कम रु. ९,९४,३९६/- ची तरतूद करण्यात यावी. याकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष तयार करावे.

१४) मा.श्री.शेख आरिफ रफियोद्दीन, सभागृह नेता यांनी दिलेल्या यादी प्रमाणे प्र.क्र. ३० मधील सर्जेपूरा येथील व्हाईट हाउत्स मागील मनपाच्या मालकीची जिम खाजगी संस्थेस कराराने चालविण्यास देणेस ही सभा मान्यता देत आहे. जेणे करून नागरिकांना चांगल्या सुविधा उपलब्ध होवून जिम मधील मशिनरी व इमारतीची निगा राहण्यास मदत होईल.

१५) मा.श्री.शेख आरिफ रफियोद्दीन, सभागृह नेता यांनी दिलेल्या यादी प्रमाणे मुकुंदनगर येथील सर्व्हे नं. ३२५/१ व ३२५/२ ए येथील पुर्वेकडील ओपन स्पेसला संरक्षक भिंत बांधणे या कामास प्राधान्य देण्यात यावे.

१६) मा.श्री.शेख आरिफ रफियोद्दीन , सभागृह नेता यांनी दिलेल्या यादी प्रमाणे टी.पी. स्कीम नं. ३ प्लाटॅ नं. ८ सर्व्हे नं. १४४ चाहुराणा बु. या महानगरपालिकेच्या ओपन स्पेस मधील जिमसाठी व्यायाम साहित्य खरेदी करणे या कामासाठी २० लाख रुपयाची तरतूद ठेवणेत यावी.

१७) मा.श्री.सप्रे दत्तात्रय नामदेव , नगरसेवक यांनी दिलेल्या यादी प्रमाणे प्र.क्र. १२ मध्ये मनोलिला नगर, भंडारी कॉलनी , विजय नगर ,रेणुकानगर व प्रेमभारती नगर मधील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे या कामांकरिता रक्कम रु. १५ लाखाची तरतूद करण्यात यावी.

१८) मा.श्रीमती गंभीर इंदरकौर किसनसिंग, नगरसेविका यांनी दिलेल्या यादीमध्ये खालील प्रमाणे कामे सुचविण्यात आलेली आहे. १) तारकपूर इंदिरा कॉलनी मधील अंतर्गत भागातील ३०० व्यासाची बंद पाईप गटर करणे. २) सिव्हील हाडको अंतर्गत भागात ४५० व ३०० एमएम व्यासाची बंद पाईप गटर करणे. ३) चिनी टेलर ते सचिन एजन्सी ते मेन नाला पर्यत ३०० एमएम व्यासाची आरसीसी पाईप गटर करणे. ४) गुरुप्रसाद बुक स्टॉल ते राधास्वामी मंदिर ते पंजाबी हॉल पर्यत रस्ते डांबरीकरण करणे. ५) सिव्हील हाडको अतर्गत भागात रस्ते डांबरीकरण करणे. ६) मेघाग्नी चौक ते साधू वासवानी कॉलनी पर्यत रस्ता डांबरीकरण करणे. ७) प्रकाशपूर भागातील रस्ते डांबरीकरण करणे. ८) तारकपूर भागातील मेन रोड ते काकडे घरापर्यत रस्ते कॉक्रीटीकरण करणे. ९) सिव्हील हाडको भागात अरुंद रस्ते कॉक्रीटीकरण करणे. १०) तारकपूर येथील

अस्थित्वातील नाला ठिकठिकाणी तुटला आहे. सदरचा नाला दुरुस्त करुन उंची वाढविणे व पीसीसी करणे. सदरील कामे या आर्थिक वर्षात प्राधान्याने क्रमाने हाती घेण्यात यावे.

१९) मा.श्री.शेख आरिफ रफियोद्दीन, सभागृह नेता यांनी दिलेल्या यादी प्रमाणे गाळाहस्तांतरण प्रक्रिया राबविताना हस्तांतरण प्रस्तावास परवानगी देताना प्रति चौरस फुटास रु. ४००/- या प्रमाणे हस्तांतरण फी मुळ गाळेधारक यांचेकडून वसुल करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

२०) मनपा कर्मचारी वसुलीचे काम जास्त टक्केवारीने वसुली करतील त्यांना सभापती स्थायी समिती यांनी सुचित केल्याप्रमाणे प्रत्येक प्रभाग समिती कडील वसुली कर्मचारी रु. ४,०००/- व ज्या प्रभाग समितीचा वसुली जास्तीत जास्त टक्केवारीने होईल अशा प्रभाग अधिका-यास रु. ५,०००/- याप्रमाणे रोख बक्षिस देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२१) रेखांकन प्रकरणास परवानगी देतांना रेखांकन धारकाकडून रस्ते खडीकरण व इलेक्ट्रीक पोल , ड्रेनेज लाईन व पाण्याची लाईन, डांबरीकरणासाठीची रक्कम मनपाकडे भरुन घेण्यात यावी.

२२) मा.सौ. रजनी अरविंद शिंदे यांनी दिलेल्या यादी प्रमाणे .कै. बाळासाहेब देशपांडे, स्वातंत्र सेनानी हिराबाई भापकर, तसेच सेनापती बापट यांचे पुतळया भोवती फर्शीकरण करणे , शोभिवंत झाडे, इलेक्ट्रीफिकेशन तसेच इतर पुतळया भोवती माहितीदर्शक फलक बसविणे आदी विविध स्वरुपाचे कामे करणेस ही सभा मान्यता देत आहे. याकामाकरिता कै.हिराबाई भापकर कै.बाळासो देशपांडे तसेच सेनापती बापट या पुतळयाच्या परिसर सुशोभित करणे या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रु. २० लाखाची तरतुद करण्यात यावी .

२३) मा.नगरसेवकयांनी लेखी पत्राद्धारे संमती दिल्यास संबधीत निधी नागरी सुविधेच्या दृष्टिने इतर प्रभागात वापरता यावा याबाबत प्रशासनाने उचीत कार्यवाही करावी.

२४) मा.सौ.आशाताई शिवाजी कराळे, नगरसेविका यांनी दिलेल्या यादी प्रमाणे सिटी सर्व्हे सावेडी गावठाण या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु. १० लाखाची तरतूद करण्यात यावी.

२५) मा.श्री.शेख आरिफ रफीयोद्यीन,सभागृह नेता,यांनी दिलेल्या यादी प्रमाणे सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु. १ लाख तरतुद करण्यात आलेली आहे. ती वाढवून रक्कम रु. ५ लाख करण्यात यावी व त्यामधून जिल्हा कबड्डी संघ अहमदनगर यांना रक्कम रु. १ लाख, प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविदयालय, अहमदनगर यांना रक्कम रु. २५ हजार व रसिक ग्रुप अहमदनगर यांना रक्कम रु. १ लाख देण्याबाबत कार्यवाही करावी.

२६) मा.सौ.शारदा दिगंबर ढवण, नगरसेवक यांनी दिलेल्या यादी प्रमाणे त्यांनी त्यांच्या प्रभाग क्र. ३ मध्ये रस्ते, गटर व ड्रेनेज लाईनची कामे सुचित केलेली आहे. याकरिता उपलब्ध निधी मधून रक्कम रु. २५ लाख पर्यत सदरची कामे प्राधान्याने करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

२७) मा.श्री.सुरेश आंबेकर, नगरसेवक यांनी दिलेल्या यादी प्रमाणे भवानी नगर सर्व्हे नं. २६/३/१ मध्ये उद्यान विकास कार्यक्रमासाठी बांधकाम, इलेक्ट्री फिकेशन, वृक्षारोपण, पाण्याची व्यवस्था अशा विविध स्वरुपाची कमे करणे कामी रक्कम रु.२० लाखाची तरतुद करण्यात यावी.

२८) मा.श्री.सुरेश आंबेकर, नगरसेवक यांनी दिलेल्या यादी प्रमाणे १) माळीवाडा सर्व्हे नं. १५/१, १६/१, १६/२, १७/१ या मंजूर रेखांकनातील खुल्या जागेमध्ये संरक्षक भिंत बांधणे २) माळीवाडा सर्व्हे नं. १८/१, १९/१, १४४(८) या जागेमध्ये सरंक्षक भिंत बांधणे याकामाकरिता सुचित केलेल्या प्रत्येक कामाकरिता १ लक्ष या प्रमाणे वरील कामा करिता ५ लक्ष रुपये तरतूद करणेत यावी.

२९) मा.सौ.आशाताई कराळे, नगरसेविका यांनी दिलेल्या यादी प्रमाणे सावेडी गावठाण शॉपिंग सेंटर मधील मोकळया हॉल मध्ये आरोग्य तपासणी व उपचार केंद्र कार्यान्वित करणेकामी रक्कम रु. ५ लक्ष तरतूद करणेत यावी.

३०) मा.सौ.रजनी अरविंद शिंदे, नगरसेविका यांनी दिलेल्या यादी प्रमाणे वारुळाचा मारुती रस्ता व दातरंगे मळा परिसर रस्ते मजबुतीकरण करणे या लेखाशिर्षाखाली रु. ९ लक्ष ऐवजी रक्कम रु. २० लाखाची तरतुद करण्यात यावी.

३१) मा.स्थायी समितीने पोहोच रस्त्याची शिफारस केलेल्या यादी मधील सोलापूर रोड ते शांतीनगर ते नामगंगा पर्यत रस्त्याचे मजूबुतीकरण करणे यास मान्यता देण्यात येत आहे. मात्र शहरी नगरोत्थान योजना लवकरात लवकर मंजूर झाल्यास त्या योजनेमधून कार्यवाही करण्यात यावी.

३२) मा.श्री.दशरथ शिंदे, नगरसेवक यांनी दिलेल्या यादी प्रमाणे पवन नगर येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामास रक्कम रु. ७ लाखाची तरतुद करणेत यावी.

३३) मा.सौ.आशाताई कराळे नगरसेविका यांच्या यादी प्रमाणे मनपा च्या सर्व दवाखान्यांमध्ये वैद्यकिय सेवा शुल्क दर प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्यापैकी नविन केस पेपर सुधारीत दर रु. १०/- ऐवजी रक्कम रु. ५/- ठेवण्यात यावा.

३४) मा.श्री शेख आरिफ रफियोद्यीन सभागृह नेता यांच्या यादी प्रमाणे मालमत्ता हस्तांतरण फी वाटणीपत्र, पोट हिस्सा, खरेदीखत रकमेवर अर्धा टक्का प्रमाणे वसुल करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच वारसपत्र, बक्षीसपत्र, हक्कसोड पत्र, राजपत्र नोंदीप्रमाणे, हाडकोच्या वाटप पत्रानुसार , मृत्यूपत्र आदी प्रकरणामधील वारस नांव नोंद कार्यवाही फी रक्कम रुपये २,०००/- करणे बाबत कार्यवाही करावी.

३५) मा.सौ.आशाताई कराळे नगरसेविका यांच्या यादी प्रमाणे कै.बा.दे.दवाखाना सुतिकागृह मधील आरोग्य सेवा शुल्क दरामध्ये खाजगी वॉर्ड मध्ये रुग्ण दाखल करताना रु. ३००/- ऐवजी प्रतिदिन खाजगी वॉर्ड सेवा शुल्क रु. २००/- आकारण्यात यावा.

३६) मा.श्री.शेख आरिफ रफियोद्दीन, सभागृह नेता यांनी दिलेल्या यादी प्रमाणे मनपाच्या मालकीची सर्व्हे नं. ३३८/१ येथील मोकळी जागा सावित्रीबाई फुले उर्दू प्राथमिक कन्या ,मुकुंदनगर अहमदनगर या शाळेस क्रीडांगणासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत त्वरीत प्रस्ताव तयार करण्यात यावा.

३७) मा.श्री शेख आरिफ रफियोद्यीन सभागृह नेता यांच्या यादी प्रमाणे जाहीरात बोर्ड जागा भाडे या लेखाशिर्षाच्या तरतुदीमध्ये वाढ करण्यात यावी.

सन २०१०-२०११ चे सुधारित व सन २०११- १२ सालाचे मुळ अंदाजपत्रक(स्कूलबोर्डासह ) मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशींसह तसेच मा.महासभेने सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे सुचविलेल्या दुरुस्तीसह मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

तसेच सदर अंदाजपत्रकाच्या २०० प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - मा.श्री.शेख आरिफ रफीयोद्यीन

अनुमोदक - मा.श्री.बाळासाहेब पवार

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

| अ.नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू) | मा.स्थायी समितीचे शिफारस केलेली तरतुद | मा.सर्वसाधारा सभेने केलेले बदल | | मा.सर्व साधारण सभेने मंजूर केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | समर्थ नगर येथील पाण्याची टाकी कार्यान्वींत करणे | | | | ४०,००,०००/- |
| २ | सिध्दार्थ नगर येथील पाण्याची टाकी कार्यान्वींत करणे. | | | | ३०,००,०००/- |
| ३ | प्र.क्र.७ मध्ये रिध्दी सिध्दी अपार्ट.ते मार्कडेय सोसा.बंद गटार करणे | | | | १०,००,०००/- |
| ४ | बालिकाश्रम ते सावेडी गावठाण पर्यत रस्ता पॅंचींग करणे. | | | | १०,००,०००/- |
| ५ | प्र.क्र.२ मध्ये स.नं.११,१२,व २३ अंतर्गत रस्ते ,डांबरीकरणे करणे | ७,००,०००/- | १३,००,०००/- | | २०,००,०००/- |
| ६ | प्र.क्र.४ मध्ये गावडे मळा येथिल नाल्यावर सिडी वर्क (पूल) बाधंणे | | | | ५,००,०००/- |
| ७ | प्रक्र.५६ मध्ये अंबिका नगर ते शाहुनगर बस स्टॉप पर्यत रस्ता डांबरीकरण करण्. | | | | १०,००,०००/- |
| ८ | प्र.क्र.१९ मध्ये सिव्हील हाडको मधील साक्षी किराणा ते वैष्णवमाता मंदीर ते क्रांती चौक ड्रेनेज लाईन टाकणे | | | | ९,९४,०००/- |
| ९ | प्रक्र.१२ मध्ये अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | | | | १५,००,०००/- |
| १० | प्र.क्र.५१व ५२ मध्ये ओपन स्पेसमध्ये संरक्षक भिंत बांधणे. | | | | ५,००,०००/- |
| ११ | प्रक.५२ मध्ये स.नं.२६/३/१ मध्ये भवानी नगर उद्यान विकसीत करण | | | | २०,००,०००/- |
| १२ | महापौर दुर्धर रोग निवारण निधी | १०,००,०००/- | ५,००,०००/- | -- | १५,००,०००/- |
| १३ | सामाजिक संस्थाना देणगी | १,००,०००/- | ३,००,०००/- | -- | ४,००,०००/- |
| १४ | विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देणे | २५,०००/- | २५,०००/- | -- | ५०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५ | वसुली विभाग अधिकारी व कर्मचारी वसुली प्रोत्साहन बक्षीस व सत्कार | -- | -- | -- | २५,०००/- |
| १६ | टी.पी. स्कीम नं. ३ प्लाटॅ नं. ८ सर्व्हे नं. १४४ मधील अद्यावत जिमसाठी साहित्य खरेदी | -- | -- | -- | २०,००,०००/- |
| १७ | सिटी सर्व्हे सावेडी गावठाण | १,००,०००/- | ९,००,०००/- | -- | १०,००,०००/- |
| १८ | कै.हिराबाई भापकर कै.बाळासो देशपांडे तसेच सेनापती बापट या पुतळयाच्या परिसर सुशोभित करणे | -- | -- | | २०,००,०००/- |
| १९ | वारुळाचा मारुती रस्ता व दातरंगे मळा परिसर रस्ते मजबुतीकरण करणे | ९,००,०००/- | ११,००,०००/- | -- | २०,००,०००/- |
| २० | सावेडी गावठाण शॉपिंग सेंटर हॉल मध्ये आरोग्य केंद्र | | | | ५,००,०००/- |

सही/-
संग्राम अरुणकाका जगताप,
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

सन २०११-२०१२ अंदाजपत्रक

मा.महासभेने मंजूरी दिलेली कामे

| अ.नं. | कामाचे नांव | रक्कम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | समर्थ नगर येथील पाण्याची टाकी कार्यान्वींत करणे | ४०,००,०००/- |
| २ | सिध्दार्थ नगर येथील पाण्याची टाकी कार्यान्वींत करणे. | ३०,००,०००/- |
| ३ | प्र.क्र.५१व ५२ मध्ये ओपन स्पेसमध्ये संरक्षक भिंत बांधणे. | ५,००,०००/- |
| ४ | कै.हिराबाई भापकर कै.बाळासो देशपांडे तसेच सेनापती बापट या पुतळ्याच्या परिसर सुशोभित करणे | २०,००,०००/- |
| ५ | प्रक.५२ मध्ये स.नं.२६/३/१ मध्ये भवानी नगर उद्यान विकसीत करणे | २०,००,०००/- |
| ६ | प्र.क्र.७ मध्ये रिध्दी सिध्दी अपार्ट.ते मार्कडेय सोसा.बंद गटार करणे | १०,००,०००/- |
| ७ | बालिकाश्रम ते सावेडी गावठाण पर्यत रस्ता पॅचींग करणे. | १०,००,०००/- |
| ८ | प्र.क्र.२ मध्ये स.नं.११,१२,व २३ अंतर्गत रस्ते ,डांबरीकरणे करणे | २०,००,०००/- |
| ९ | प्र.क्र.४ मध्ये गावडे मळा येथिल नाल्यावर सिडी वर्क (पूल) बाधंणे | ५,००,०००/- |
| १० | प्रक्र.५६ मध्ये अंबिका नगर ते शाहुनगर बस स्टॉप पर्यत रस्ता डांबरीकरण करणे्. | १०,००,०००/- |
| ११ | प्र.क्र.१९ मध्ये सिव्हील हाडको मधील साक्षी किराणा ते वैष्णवमाता मंदीर ते क्रांती चौक ड्रेनेज लाईन टाकणे | ९,९४,०००/- |
| १२ | प्रक्र.१२ मध्ये अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे | १५,००,०००/- |
| १३ | महापौर दुर्धर रोग निवारण निधी | १५,००,०००/- |
| १४ | सामाजिक संस्थाना देणगी | ४,००,०००/- |
| १५ | विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देणे | ५०,०००/- |
| १६ | वसुली विभाग अधिकारी व कर्मचारी वसुली प्रोत्साहन बक्षीस व सत्कार | २५,०००/- |
| १७ | टी.पी. स्कीम नं. ३ प्लाटॅ नं. ८ सर्व्हे नं. १४४ मधील अद्यावत जिमसाठी साहित्य खरेदी | २०,००,०००/- |
| १८ | सिटी सर्व्हे सावेडी गावठाण | १०,००,०००/- |
| १९ | वारूळाचा मारूती रस्ता व दातरंगे मळा परिसर रस्ते मजबुतीकरण करणे | २०,००,०००/- |
| २० | सावेडी गावठाण शॉपिंग सेंटर हॉल मध्ये आरोग्य केंद्र | ५,००,०००/- |

सही/-

संग्राम अरुणकाका जगताप,

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

| अ.नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू) | मा.स्थायी समितीचे शिफारस केलेली तरतूद | मा.सर्वसाधारण सभेने केलेले बदल | | मा.सर्व साधारण सभेने मंजूर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | जाहिरात बोर्ड जागा भाडे | ३,५५,०००/- | ९,००,०००/- | | १२,५५,०००/- |
| २ | गाळा भाडे | १,००,००,०००/- | ८,२५,०००/- | | १,०८,२५,०००/- |
| ३ | कार्यालय / शाळा दुरुस्ती | १,७५,०००/- | -- | २५,०००/- | १,५०,०००/- |
| ४ | श्वान दंशावर लस खरेदी | ५,००,०००/- | -- | १,००,०००/- | ४,००,०००/- |
| ५ | इमारत दुरुस्ती | १०,००,०००/- | -- | ५,००,०००/- | ५,००,०००/- |
| ६ | महापौर दुर्धर रोग निवारण निधी | १०,००,०००/- | ५,००,०००/- | -- | १५,००,०००/- |
| ७ | सामाजिक संस्थाना देणगी | १,००,०००/- | ३,००,०००/- | -- | ४,००,०००/- |
| ८ | विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देणे | २५,०००/- | २५,०००/- | -- | ५०,०००/- |
| ९ | वसुली विभाग अधिकारी व कर्मचारी वसुली प्रोत्साहन बक्षीस व सत्कार | | २५,०००/- | -- | २५,०००/- |
| १० | सिटी सर्व्हे सावेडी गावठाण | १,००,०००/- | ९,००,०००/- | -- | १०,००,०००/- |
| ११ | प्रक.५२ मध्ये स.नं.२६/३/१ मध्ये भवानी नगर उद्यान विकसीत करणे | | २०,००,०००/- | -- | २०,००,०००/- |

सही/-
संग्राम अरुणकाका जगताप,
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.